Original Minutes

Dt. 8 & 9 May 2018

Time:- 3.00 p.m.

Venue:-
Vits Hotel, Railway Station, Aurangabad

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ

बैठक महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद.

दि. ०८ व ९ मे २०१८ वेळ सकाळी ११. ०० वाजता	ठिकाणः- हॉटेल विट्स, रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद

सभेचे इतिवृत्त

दि. ८ व ९ मे, २०१८ रोजी ११.०० वाजता हॉटेल विट्स, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद येथे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची बैठक मा. जनाब हुसैन दलवाई साहेब, खासदार, तथा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. त्यात खालील प्रमाणे मा. सदस्य उपस्थित होते. सदरच्या सभेत खालील विषयावर विचार विनिमय करुन निर्णय घेण्यात आले.

१) मा. जनाब हुसैन दलवाई साहेब, सभेचे अध्यक्ष

२) मा. जनाब मौलाना गुलाम वस्तानवी साहेब, सदस्य

३) मा. जनाब मौलाना जहीर अब्बास रिजवी साहेब, सदस्य

४) मा. जनाब आसिफ शौकत कुरेशी साहेब, सदस्य

५) मा. जनाब खालीद बाबु कुरेशी साहेब, सदस्य

६) मा. जनाब इम्तियाज मुश्ताक काजी साहेब, सदस्य

७) मा. जनाब एस. सी. तडवी साहेब सदस्य सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद

सभेच्या सुरुवातीस मा. जनाब मौलाना गुलाम मोहम्मद वस्तानवी साहेब सदस्य यांनी कुरआन-ए-पाक मधील सुरह फातीहाची तिलावत केली व सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यांत आली

सभेचा अजिंडा विषय सुचि व त्याचा तपशिल आठ दिवस अगोदर सर्व सदस्यांना देण्यात यावे असे सदस्य मा. जनाब आसिफ शौकत कुरेशी व खालीद बाबु कुरेशी यांनी सुचना केली व ऐनवेळेला अजिंडा दिल्या बद्दल सर्व सदस्यांनी नाराजी व्यक्त केली.

विषय क्रं. १. **सन्माननिय सदस्यांच्या रजे बाबत**

ठराव क्र. १ जनाब एम.एम.शेख साहेब, कार्याध्यक्ष हे आजारी असल्यामुळे रजेवर आहे. म्हणुन त्यांच्या रजेस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

विषयः- क्रं. २. **मागिल सभा दि. १२-जुन-२०१७ च्या सभेच्या इतिवृत्त वाचून कायम करणे बाबत.**

ठराव क्र. २. मागील सभा दि.१२/६/२०१७ च्या इतिवृत्तास सभे समोर वाचून दाखविण्यात आले त्यावर सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती इतिवृत्ता मधील ठराव मध्ये सुधारणा करुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

विषय क्रं. ३. **मा. सदस्य श्री. आसिफ शौकत कुरेशी साहेब व खालीद बाबू कुरेशी साहेब यांची महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळावर सदस्य म्हणून नियुक्ती बद्दल त्यांना पुष्प गुच्छ देऊन सत्कार करणे**

ठराव क्र. ३. सभेच्या अध्यक्ष जनाब हुसैन दलवाई साहेब खासदार यांच्या हस्ते मा. सदस्य आसिफ शौकत कुरेशी साहेब व खालेद बाबु कुरेशी साहेब यांची महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळावर सदस्य म्हणुन नियुक्ती झाल्या बद्दल पुष्प गुच्छ देवून सत्कार करण्यांत आले. व त्यांचे अभिनंदन करण्यांत आले.

विषय क्रं. ४. **महाराष्ट्र राज्य वक्फ् मंडळावर पुर्ण वेळ मुख्य कार्यकारी अधिकारी ची नियुक्ती बाबत निर्णय घेणे.**

ठराव क्र. ४ महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळावर पुर्ण वेळ मुख्य कार्यकारी अधिकारी पदासाठी कक्ष अधिकारी अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्र. वक्फ.२०१८/प्र.क्र.४१/क-४ दि. ३/२/२०१८ अन्वये जनाब साजीद खान पठाण, उप सचिव, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, यांनी इच्छुकता दर्शवली असल्याचे सामान्य प्रशासन विभागाकडून कळविल्या प्रमाणे त्यांनी संबंधितांची वैयक्तीक माहिती व १० वर्षाच्या कालावधी पासून आता पर्यंत धारण करीत असलेल्या पदांचा तपशिल व वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ चे गोपनिय अहवाल इत्यादी आवश्यक कार्यवाहीस्तव पाठविले आहे.

यावर सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती सदरचा अर्ज रेकॉर्डवर ठेवावे एकच अर्ज प्राप्त झाल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी पुर्णवेळ नियुक्त करण्यासाठी या पदासाठी आवश्यक असलेल्या सेवा पात्रतेचा उल्लेख करुन राज्य पातळी वरील दैनिक लोकमत, ईन्कलाब, उर्दु टाईम्स, दैनिक भास्कर हिंदी वर्तमान पत्रात जाहिरात देवून इच्छुकांचे अर्ज मागविण्यात यावे. असे सर्वानुमते ठरले.

विषय क्रं. ५ तत्कालीन मु.का.अ. यांनी दि. १७/१८ मे. २०१७ रोजीच्या बैठकीत पारीत करण्यात आलेले विषयावर घेण्यात आलेले ठरावावर पुनर्रविचार करणेसाठी दिलेल्या पत्रावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे

१) विषय क्रं. १९ ठराव क्रं. २७
२) विषय क्रं ३२ ठराव क्रं. ४०
३) विषय क्रं. ३८ ठराव क्रं. ४६

(सोबत ठरावाच्या प्रति जोडण्यात येत आहे.)

ठराव क्र. ५ १) सविनय सादर करण्यात येते की, विषय क्रं. -१९ ठराव क्रं. २७ मध्ये घेतलेला निर्णय हे वक्फ मंडळाच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेऊन निर्णय घेतलेला नाही. सदरच्या निर्णयामुळे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळा वर जवळपास ९८,४०,००० व शिष्यवृत्तीसाठी रुपये ५०,००,०००/- असे एकुण १,४८,४०,०००/- (एक कोटी अठ्ठेचाळीस लाख चाळीस हजार फक्त) अधिकचा बोजा पडणार असून उत्पन्नाच्या साधन उपलब्ध करुनच वरील निर्णयानुसार कार्यवाही करणे उचित होईल तो पर्यंत सदरच्या निर्णयावर पुनर्रविचार करण्यात यावा अशी माझी धारणा झालेली आहे.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या सरळ अधिपत्त्याखाली एकुण ७३ ईमाम व ३८ मौअज्जनची संख्या असून त्यांच्या मानधनात वाढ करुन एकुण मानधन दरमहा रुपये १५,०००/- व मौअज्जन यांच्या मानधनात वाढ करुन एकुण दरमहा रक्कम ८,०००/- रुपये व त्यांच्या दोन मुलांना पहिली ते बारावी महाराष्ट्र शासनाच्या मान्यता प्राप्त शिक्षण घेणारे विद्यार्थ्यांना शिष्युवृत्ती देण्याचे ठरले होते. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सध्या वरील प्रमाणे मानधनाच्या रक्कमेत वाढ करणे व शिष्यवृत्तीसाठी वार्षीक एकुण रुपये १,८८,४०,०००/- इतका अधिक बोजा पडणार असल्याचे नमुद करुन उत्पन्नाचे साधन उपलब्ध करुनच वरील निर्णयावर कार्यवाही करणे उचित होईल म्हणुन सदरच्या निर्णयावर पुर्नविचार करावा अशी सुचना केली होती.

यावर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती दि. ८ व ९ मे २०१८ रोजी ईतिवृत्त कायम करतांना महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे आर्थीक स्थितीचा

आढावा घेण्यात आला व महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या सरळ अधिपत्त्याखाली असलेली इमाम यांना दरमहा एकत्रित मानधन १०,०००/- व मौअज्जन यांना दरमहा एकत्रित रुपये ६,०००/- माहे १ मे -२०१८ पासून अदा करण्यांत यावे तसेच त्यांच्या दोन मुलांना व तिसरी मुलगी असली तर त्यास किंवा तिन्ही मुली असल्यास या तिन्ही मुर्लीना वार्षीक प्रत्येकी १०,०००/- रुपये शासन मान्यता प्राप्त शाळेत पहिली ते बारावी पर्यंत शिकणा-या विद्यार्थ्यांनाच देण्यात यावे असे सर्वानुमते ठरले तसेच ईद निमित्त ईदगाह मध्ये नमाज पठण करण्यासाठी वक्फ मंडळाच्या अधिपत्त्याखाली असलेल्या ईमामास रुपये १,०००/- प्रमाणे अदा करण्यांत यावे. ईदसाठी वक्फ मंडळाकडून नियुक्त ईदगाह मधील ईमामास मागील दोन वर्षाचे प्रत्येकी १,०००/- रुपये प्रमाणे मानधन अदा करावे असे सर्वानुमते ठरले.

२) सुलतान मस्जीद ट्रस्ट च्या कब्रस्तानाची जमिन राष्ट्रीय महारामार्गासाठी संपादीत होत असल्याने सदर जमिनीचा मावेजाच्या मोबदल्यात दुसरी जमिन घेण्या ऐवजी त्या जमिनीचा मोबदला वक्फ संस्थेच्या नावावर जमा करुन घ्यावे तद्दनंतर वक्फ संस्थेने सादर केलेले योजनेनुसार सदर रक्कमेचा विनियोग कण्यात यावा. ठराव क्रं. ४० अन्वये घेतलेल्य निर्णय हे वक्फ कायदा १९९५ चे कलम ५१ व ५२ च्या तरतुदीच्या भंग असुन सदरच्या ठराव कायद्याच्या अनुषंगाने बेकायदेशीर आहे अशी माझी धारणा झालेली आहे म्हणून यावर पुनर्रविचार करण्यात यावा.

यावर दि. ८ व ९ मे २०१८ रोजी ईतिवृत्त कायम करतांना यावर सविस्तर चर्चा झाली तसेच संबंधित न्यासाच्या विश्वस्तांना बोलावून त्यांच्याशीही सविस्तर चर्चा करण्यांत आली चर्चेअंती सुलतान मस्जीद ट्रस्टच्या कब्रस्तानची जमीन सर्वे नं. ११२ एकुण क्षेत्र १ हेक्टर १५ आर असून त्यापैकी ३२ गुंठे जमीन राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ व जुना क्र. १७ करीता संपादीत होत आहे व त्या ऐवजी शासनाच्या संबंधित विभागाकडूनच सर्वे नं.२००/६अ, ७अ एकुण क्षेत्र ३९ गुंठे जमीन हे मौजे महाडच्या लगत असून कब्रस्तानासाठी संबंधित विभागाकडून खरेदी करुन देण्यात येत आहे म्हणुन वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५१ चा भंग होणार नसुन कलम ५१ (ड) प्रमाणे वक्फाचे हित व उद्देश पर्याप्त पध्दीतीने सुरक्षीत ठेवण्यासाठी व्याज हा बाजार मुल्यानुसार राहील किंवा संपादीत जमीनीच्या ठिकाणी योग्य मोबदल्यासह कोणतीही उपयुक्त जमीनी असेल अशी तरतुद करण्यांत आलेली असून सदर संस्थेच्या वरील कब्रस्तानासाठी जमीन खरेदीस मान्यता देण्यात येत आहे. उपविभागीय प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून खरेदी करण्यांत आलेल्या संपादीत जमीनीच्या मोबदल्यात घेत असलेल्या मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ चे कलम

४१ नुसार रितसर प्रस्ताव संस्थेच्या अभिलेखात नोंदविण्यासाठी वक्फ मंडळासमोर ठेवण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

३) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ औरंगाबाद च्या मा. सर्वोच्च न्यायालय, भारत सरकार न्यु दिल्ली व उच्च न्यायालय खंडपीठ, मुंबई औरंगाबाद व नागपूर येथील ॲडव्होकेट ची नियुक्ती करण्यासाठी मा. अध्यक्ष व सदस्यांची चर्चा मसलत करणे योग्य असून त्याची दक्षता घेण्यात यावी. परंतू मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दैनंदिन कामकाजात हस्तक्षेप व अधिकारात गदा येणारा ठराव असून प्रत्येक प्रकरणात मा. अध्यक्ष व सदस्यांची किंवा जनाब हबीब फकीह साहेब यांची मान्यता घेऊनच नियुक्ती करणे शक्य होणार नाही अशी माझी धारणा झालेली आहे म्हणून यावर पुनर्र विचार करण्यात यावा.

यावर सविस्तर चर्चा करण्यांत आली न्यायालयातील सरकारी वकील यांना वक्फ मंडळातील प्रलंबित असलेले प्रकरणे देण्यात यावी तसेच ज्या वकीलाकडे यापुर्वी प्रकरणे देण्यात आलेली आहे. नवीन ॲडव्हाकेटसचे पॅनल तयार करण्यांत येत असल्यामुळे त्यांच्याकडून सर्व प्रकरणे परत घेण्यांत यावी. अशी सुचना मा. सदस्या कडून करण्यांत यावी.

यावर सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सह सचिव अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ जनाब एस.सी. तडवी साहेब यांनी मंत्रालयातील कायदा व न्याय मंत्रालयाकडून सरकारी वकीलांची यादी मागवून घ्यावी व सन्माननीय सदस्यांशी चर्चा मसलत करुन ॲडव्होकेट पॅनल ठरवावे. असे सर्वानुमते ठरले.

दि. १२/०६/२०१७ मध्ये पुढे ढकलण्यात आलेले विषय

विषय क्रं. ६ **महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे कर्मचा-यांना देय असणारे ५वा व ६वा वेतन आयोगाचे फरकाची थकीत रक्कम आदा करण्यास मान्यता देणे बाबत.**

मागील सभा दि. १२/०६/२०१७ मध्ये ठरल्या प्रमाणे सादर करण्यात येते की, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे कर्मचा-यांना ५वा व ६वा वेतन आयोगानुसार वेतन आदा करण्यात आलेले आहे. परंतू वरील आयोगानुसार नियमा प्रमाणे थकीत फरकाची रक्कम आदा करण्यात आलेली नाही सदर थकबाकी नियामा प्रमाणे आदा करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे बहुतांश कर्मचारी सेवा निवृत ही झालेले आहेत त्यांना आजपर्यंत फरकची रक्कम अदा करण्यात आलेली नाही. वक्फ मंडळाचे कर्मचा-यांना देय असलेली फरकाची थकीत रक्कमेचा तपशील खालिल प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१) ५वा वेतन आयोगानुसार थकीत असलेली एकुण देय रक्कमेचा तपशिल.

अ. क्रं.	तपशील	रक्कम
अ	वक्फ मंडळाचे मुख्यालय व प्रादेशिक आणी जिल्हा कार्यालयाचे कर्मचा-यांचे देय	२३,६९,६८६/-
ब	वक्फ मंडळाचे इस्टेट पनचक्की कर्मचा-यांचे देय रक्कम	१,२३,६२८/-
	एकुण देय रक्कम	२४,९३,३१४/-

२) ६वा वेतन आयोगानुसार थकीत असलेली एकुण देय रक्कमेचा तपशिल.

अ. क्रं.	तपशील	रक्कम
अ.	वक्फ मंडळाचे मुख्यालय व प्रादेशिक आणी जिल्हा कार्यालयाचे कर्मचा-यांचे देय रक्कम	रु. १,०१,६६,७३३/-
ब	वक्फ मंडळाचे इस्टेट पनचक्की कर्मचा-यांचे थकीत देय रक्कम	रु. १७,१८,५५६/-
	एकुण	**रु. १,१८,८५,२८९/-**

तरी नियमा प्रमाणे ५वा व ६वा वेतन आयोगाचे थकीत रक्कत संबधीत कर्मचा-यांना आदा करण्यास वक्फ मंडळाचे लेखा विभागाकडे अर्थिक उपलब्धता आहे सद्या वक्फ मंडळाचे (Wakf Fund) बँक खात्यामध्ये (Fix Deposit) शिल्लक रक्कम रु. ११,४२,४३,१३६/- व चालू खात्यामध्ये शिल्लक रक्कम रु. ८२,९५,६२३/- इतकी शिल्लक आहे त्या प्रमाणे सदर खात्यात एकुण रक्कम रु. १२,२५,३८,७५९/- इतकी शिल्लक आहे.

तसेच वक्फ मंडळाचे (Institution Fund) बँक खात्यामध्ये (Fix Deposit) शिल्लक रक्कम रु. ३,७७,७४,७८७/- व चालू खात्यामध्ये शिल्लक रक्कम रु. ७,८४,८६५/- इतकी शिल्लक आहे त्या प्रमाणे सदर खात्यात एकुण रक्कम रु. ३,८५,५९,६५२/- इतकी शिल्लक असुन ५ वा व ६वा वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार संबंधीत कर्मचा-यांना फरकाची रक्कम आदा करणेसाठी मान्यता मिळावी.

ठराव क्र. ६

यावर सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे कर्मचा-यांना पाचवा व सहाव्या वेतन आयोगानुसार थकीत असलेली देय वेतनाची प्रस्तावीत रक्कम अदा करण्यांत यावी. असे सर्वानुमते ठरले.

विषय क्रं. ७

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सेवा निवृत झालेले कर्मचा-यांना नियमा प्रमाणे अर्जीत रजा रोखीकरण (Leave Encashment) ची रक्कम आदा करण्यास मान्यता देणे बाबत.

मागील सभा दि. १२/०६/२०१७ मध्ये ठरल्या प्रमाणे सादर करण्यात येते की, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सेवा निवृत्त झालेल्या कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१ चे नियम ६५(१), (२) a,b,c. नुसार रजा रोखीकरण (Leave Encashment) ची रक्कम आदा केली जाते परंतु वक्फ मंडळाचे सेवा निवृत्त झालेले एकुण (२५) कर्मचा-यांचे रजा रोखीकरणाचे देयक अद्याप आदा करण्यात आलेले नाही त्यांचे देय असलेले रजा रोखीकरणाचे रक्कमेचा तपशील या खालील प्रमाणे असुन त्यास मान्येता मिळावी.

Statement showing the Leave Encashment of retired employees Maharashtra State Board of Waqfs, Aurangabad

Sr No.	Name	Designation	Date of Retirement / Death	Leave Balnace	Amount
1	2	3	4	5	6
1	Wadood Ahmed Khan	Wakf Officer	31.12.2007	243 days	70632
2	Mohd. Abdul Gaffar	Jr. Clerk	Death on dt 10.11.2008	280 days	121800
3	Shaikh Muneer	Wakf Officer	31.12.2009	300 days	188720
4	Shaikh Ismail	Wakf Officer	31.01.2011	226 days	149092
5	Sayed Abed Ali	Jr. Clerk	31.03.2012	300 days	177750
6	Mustafa Khan	Driver	30.04.2012	300 days	194340
7	Habib Ahmed	Jr. Clerk	31.01.2013	300 days	215340
8	Ishaque Mohiuddion	Bill Collector	31.03.2013	300 days	205540
9	Manzoor Khan	Wakf Officer	22.05.2013	243 days	187454
10	Saeeda Bi	Malan/ Sweeper	31.07.2013	112 days	59808
11	Shaikh Maqsood	Wakf Officer	31.08.2013	300 days	284400
12	S.N.Zafar	Wakf Officer Quazat	Death on dt 20-01-2014	155 days	130758

13	Rasheed Khan	Peon H.O	Death on dt 25-03-2014	300 days	180880
14	Mohammad Jameeluddin	Dy.Wakf Officer	Death on dt 17-09-2014	213 days	197522
15	Shaikh Zafar	Regional Wakf Officer	19.06.2015	84 days	109891
16	Mohammad Ibrahim	Peon DWO Jalna	Death on dt 31-08-2015	300 days	218120
17	M.A. Rauf	Jr. Clerk	30.06.2016	282 days	285318
18	Shaikh Naseer	Peon H.O	30.09.2016	300 days	217120
19	Mohammad Maroof	Overseer	31.10.2016	269 days	417021
20	Fahim Akhtar	Clerk	31.12.2016	300 days	293850
21	Sayed Anwer Ali	Peon	30.04.2017	300 days	247740
22	Pathan Munir Khan	Wakf Officer	30.06.2017	300 days	412960
23	Mohammad Nazir	Dy.Wakf Officer	30.06.2017	285 days	313405
24	Mohammad Majazuddin Farooqui	Clerk	31.12.2017	285 days	333906
25	Mohammad Mukhtar	Dy Wakf Officer	31.01.2018	174 days	218729
					5432096/-

ठराव क्र.७ यावर सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सेवा निवृत्त झालेल्या कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१ चे नियम ६५(१), (२) a,b,c नुसार रजा रोखीकरण Leave encashment अदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

विषय क्रं. ८ **प्रादेशिक वक्फ अधिकारी, पुणे कार्यालयाचे थकीत भाडे अदा करणे बाबत.**

मागील सभा दि. १२/०६/२०१७ मध्ये ठरल्या प्रमाणे सादर करण्यात येते की, प्रादेशिक वक्फ अधिकारी पुणे विभाग पुणे यांनी दिनांक ०५/०६/२०१७ अन्वये अहवाल सादर करुन त्या सोबत भाडे रक्कमेचे मागणी केलेली प्रत जोडलेले आहे त्यानुसार पुणे विभागीय कार्यालयाचे भाडे माहे १ जुन २०१४ पासुन ते ३१-०१-२०१६ पर्यंत (२० माहेन्याचे) प्रतिमाह १२,०००/- प्रमाणे एकुण रक्कम रु. २,४०,०००/- दोन लाख चाळीस हजार रुपये मंजुर करण्या बाबत भाडे करार पत्र आणि रक्कम आदा केलेली पावती जोडलेली आहे त्यानुसार सदर रक्कम आदा करण्यास वक्फ मंडळाचे मान्यता देण्यास सादर आहे.

ठराव क्र. ८ यावर सविस्तर चर्चा करण्यांत आली व या बाबत प्रादेशिक वक्फ अधिकारी पुणे यांना समक्ष बोलावून भाडयाचे रक्कमे बाबत सविस्तर विचारणा करण्यांत आली चर्चेअंती पुणे विभागीय कार्यालयाचे थकीत भाडे दि. १/६/२०१४ ते ३१/१/२०१६ पर्यंत एकुण (३०) महिणे प्रतिमहा १२०००/- प्रमाणे एकुण रक्कम रुपये २,४००००/- अदा करणे बाबत सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

विषय क्रं. ९ **पुर्णा जि. परभणी येथील सर्वे नं. ७ जुना सर्वे नं. १८७ मधील अतिक्रमणा निष्कासीत करणे बाबत जिल्हाधिकारी परभणी यांच्या कडे प्रस्ताव दाखल करणे बाबत.**

जिल्हा वक्फ अधिकारी परभणी यांनी पुर्णा येथील सर्वे नं. ७ जुना सर्वे नं. १८७ मधील अतिक्रमणा बाबत सविस्तर प्रस्ताव सादर करणे साठी सुचना देण्यात आलेले आहे. वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५४ अन्वये सदरच्या अतिक्रमणा बाबत कायदेशीर कार्यवाही करणे आवश्यक असून मु.का.अ. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, यांनी प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन अतिक्रमण निष्कासीत करणे बाबत कायदेशीर पुर्तता करुन मा. महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण औरंगाबाद यांच्या कडे रितसर अर्ज करणे आवश्यक आहे. मान्येत्स्तव सादर

ठराव क्र. ९ यावर सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५४ नुसार कार्यवाही करुन मा. महाराष्ट्र वक्फ न्यायाधिकरण यांच्याकडे आपल्या अभिप्रायासह निर्णयासाठी प्रकरण दाखल करावे. असे सर्वानुमते ठरले

विषय क्रं. १० **सुर्ख अब्दाल दर्गाह ट्रस्ट, रविवार पेठ, पुणे च्या व्यवस्थापन विश्वस्तांच्या फेरफार व योजना बाबत.**

सविनय सादर करण्यात येते की, जनाब अतिख रियाज अहमद खान व जनाब सय्यद अब्दुल सत्तार, रा. रविवार पेठ, पुणे यांनी दि. ०३.११.२०१६ रोजी अर्ज देवुन या कार्यालयाचे निदर्शनास आणुन दिलेले आहे की, वक्फ संस्था सुर्ख अब्दाल दर्गा, रविवार पेठ, पुणे ता. जि. पुणेच्या व्यवस्थापण समितीच्या नविन निवडणुक सन २०१६ ते २०२१ पर्यंत निवडणुक अधिकारीची नियुक्ती करणे बाबत अर्ज केले आहे तसेच सदर निवडणुकी पुर्ण करण्या करती (५) लोकांची ॲडव्होक कमिठीची नियुक्ती करणे बाबत अर्ज दिलेले आहे.

जनाब सय्यद रियाज इस्माईल, रविवार पेठ, पुणे यांनी दि. १६.०६.२०१६ रोजी सदर संस्थेच्या नविन व्यवस्थापण समितीची फेरफार अर्ज (चेंज रिपोर्ट) या कार्यालयास दाखल केलेली आहे.

जनाब सय्यद रियाज इस्माईल, रविवार पेठ, पुणे यांनी दि. २९.१२.२०१६ रोजी सदर संस्थेच्या नविन प्रस्तावीत योजना अर्ज (स्किम) या कार्यालयास दाखल केलेले आहे.

सदर प्रकरण हे मा. वक्फ मंडळाची बैठक दि. २५.०५.२०१७ रोजी ठेवण्यात आलेली होती सदर प्रकरण हे पुढील बैठकीत ढकळण्यात आलेले होते.

वरील सर्व बाबींचा विचार करून, वक्फ संस्था मदिना मस्जिद ट्रस्ट, ११९८, रविवार पेठ, पुणे-४११००२ व्यवस्थापण समितीच्या निवडणुक, व्यवस्थापन विश्वस्ता मध्ये फेरफार व योजना मान्यतेस्तव सादर

ठराव क्र. १० यावर सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती वक्फ अधिनियम १९९५ चे कलम २७ नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह एक सन्माननीय सदस्यांनी सुनावणी घेवून प्रकरणांत निर्णय घ्यावा असे सर्वानुमते ठरले.

विषय क्रं. ११ मदिना मस्जिद ट्रस्ट, ११९८, रविवार पेठ, पुणे-४११००२ च्या व्यवस्थापण समितीच्या निवडणुक व ॲडहोक कमेटी बाबत

सविनय सादर करण्यात येते की, श्री. शब्बीर अब्बास शेख व इतर रा. १२९८, रविवार पेठ, पुणे-४११००२ यांनी दि. ०६.१०.२०१६ रोजी अर्ज देवुन या कार्यालयाचे निदर्शनास आणुन दिले आहे की, वक्फ संस्था मदिना मस्जिद ट्रस्ट, ११९८, रविवार पेठ, पुणे-४११००२ च्या व्यवस्थापण समितीच्या निवडणुक ३०.११.२००९ साली निर्णय अधिकारी श्री. शेख अखलाख यांनी घेतली त्याची मुदत २९.११.२०१४ रोजी संपली, ट्रस्टच्या स्कीम व बायॅलॉज ९ए प्रमाणे मुदतीत ५ वर्षानंतर पुन्हा निवडणुक घेणे ट्रस्टवर बंधकारक आहे. मात्र त्याची पुर्तता ट्रसटने अद्याप पुर्ण केलेली नाही. अर्जदारांचे कथन आहे की, सध्याचे ट्रस्टची नियमाप्रमाणे कोणतीही सर्वसाधारण सभा घेत नाहीत अथवा घेतलेली नाही, कोणतेही जमाखर्च ठेवलेले नाहीत अथवा खर्चाला मान्यता घेतलेली नाही, ट्रस्टच्या मालकीची ताब्याची भांडी, परस्पर विकली व मिळकतीची कोणत्याही सर्वसाधारण सभेची पुर्व परवानगी न घेता विल्हेवाट

लावली व त्यामुळे ट्रस्टच्या मिळकतीचे नुकसान होत आहे, ट्रस्टमध्ये असणाऱ्या भाडेकरू बरोबर लागेबांधे असल्याने वक्फच्या, ट्रस्टच्या नियमाप्रमाणे भाडेकरूकडून भाडे वसुली होत नाही व परिणामी ट्रस्टचे अतोनात नुकसान होत आहे. तरी त्वरीत ह्या ट्रस्ट व वक्फच्या कमिनशनीर नेमण्यात यावी व दिलेले यादीनुसार सर्व खर्चाची जबाबदारी घेण्यात व ते वक्फ कडे भेटण्यास सर्व तयार आहोत व त्यामुळे कमिशनर नेमणे सोईचे होईल करीत अर्ज सादर करून विनंती केली आहे.

तसेच सदर प्रकरणांत श्री. शेख असलम महेबुब, १६१, रविवार पेठ, पुणे-४११००२ यांनी दि. १०.११.२०१६ रोजी अर्ज देवुन सदर ट्रस्टच्या सन २०१२ पासुन निवडणुक झाली नाही व सदर निवडणुकी होई पर्यंत कमेटीची नियुक्त करणे बाबत प्रस्तावीत नाव दिलेले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करून, वक्फ संस्था मदिना मस्जिद ट्रस्ट, ११९८, रविवार पेठ, पुणे-४११००२ व्यवस्थापण समितीची निवडणुक बाबत निर्णयास्तव सादर.

ठराव क्र. ११ यावर सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती सदर संस्थेच्या मान्यता प्राप्त योजनेनुसार निवडणुक अधिकारीची नियुक्ती करुन तातडीने निवडणुक घ्यावी व येणा-या विश्वस्ताकडे सदर संस्थेचा कार्यभार सोपवावे असे सर्वानुमते ठरले.

विषय क्रं. १२ मदरसा व मस्जीद तालीमुल ईस्लाम जमियत अहले हदीस सोनापूर भांडुप जि. मुंबई च्या व्यवस्थापनासाठी निवडणुक घेणे बाबत.

सविनय सादर करण्यात येते की, श्री. फा.नु.पठाण, कक्ष अधिकारी, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र वक्फ २०१७/प्र.क्र.११२/का.४ दि. ०२.०५.२०१७ अन्वये वक्फ संस्था मदरसा व मस्जिद तालीमुल इस्लाम जमियात अहले हदीस, केअर ऑफ मुख्तर अली गोरेगाव लिंक रोड, दुकान नं. १, भांडुप, मुंबई-७८च्या संबंधी श्री. इसाक गफुर इनामदार यांनी त्यांच्या पत्रान्वये सदर संस्थेची ट्रस्टी असल्याचे नमुद करून अशी तक्रार केली आहे की, सदर संस्थेच्या निधीचा गैरवापर होत आहे व या संस्थेच्या नावावर अनुधिकृत कार्यवाही केल्या जात आहेत, तसेच श्री. इसाक गफुर इनामदा यांनी ते स्वत: उपरोक्त वक्फ संस्थेचे ट्रस्टी असल्याने सदर बाब तसेच त्यांनी केलेल्या तक्रारी स्वरूप विचारात घेता सदर प्रकरणाची तातडीने चौकशी करून त्यानुषंगाने वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदीनुसार

आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करणे बाबत पत्र दिले आहे.

वक्फ संस्था मदरसा व मस्जिद तालीमुल इस्लाम जमियात अहले हदीस, केअर ऑफ मुख्तर अली गोरेगाव लिंक रोड, दुकान नं. १, भांडुप, मुंबई-७८ या कार्यालयात नोंदणीकृत असुन ज्याचा नोंदणी क्र. MSBW/MUM/२८८/२०१३ असा आहे.

श्री. मौलाना अब्दुल सालम पि. मोहम्मद हदीस खान यांनी दि. १३.०३.२०१३ रोजी सदर संस्थेच्या व्यवस्थापण समितीचे फेरफार अर्ज या कार्यालयास दाखल केले होते, प्रकरणांत श्री. रव्वाब अली मोहम्मद हबीब खान व इतर यांनी दि. ०४.०३.२०१३ रोजी आक्षेप फेरफार अर्जावर दाखल केले होते, तसेच प्रकरणांत श्री. वहीदुल्लाह अजीमुल्लाह मंसुरी यांनी हि त्यांचे आक्षेप अर्ज दि. १२.०४.२०१३ रोजी या कार्यालयास दाखल केले होते त्यानंतर सदर फेरफार अर्जामध्ये आक्षेप असल्याने सर्व संबंधीतांना सुनावणीसाठी नोटीस निर्गमित करण्यात आले होते, दि. २४.०४.२०१५ रोजी श्री. वहिदुल्ला पि. अजीमुल्ला यांनी या कार्यालयास विनंती केली होती की सदर संस्थेच्या दि. २६.११.१९८८ पासुन व्यवस्थापण समितीचे इलेक्शन झालेले नाही, त्यानंतर या कार्यालयाचे पत्र क्र. मरावंम/चौकशी/न.क्र. २५-१३४, ३१२-२०१३/१९७९/१५ दि. २४.०४.२०१५ रोजी जाहिर प्रगटन निर्गमित करून सदर संस्थाचे व्यवस्थापण समितीचे निवडणुक घेण्यासाठी आक्षेप/उजर मागविण्यासाठी पत्र निर्गमित करण्यात आले होते. प्रकरणांत दि. ०९.०५.२०१५ रोजी मौलाना अब्दुल सालम पि. मोहम्मद हदीस खान यांनी आक्षेप दाखल करून विनंती केली होती संबंधीताना कोणतेही आदेश देण्यापुर्वी सुनावणीची संधी देण्यात यावे अशी विनंती केले होते, तसेच प्रकरणांत प्रादेशीक वक्फ अधिकारी, कोकण विभाग मुंबई यांचे अहवाल पत्र क्र. चौकशी/९७/२०१५ दि. २५.०५.२०१५ अन्वये सदर संस्थाचे सर्व व्यवस्थापणसाठी रितसर चालविण्यासाठी योजना मधील तरतुदीनुसार नविन निवडणुक घेणे गरजेचे असल्याने सदरचे अर्जाची सुनावणीचे निकाली निर्णय वर विचार करून पुढील निर्णयासाठी सविस्तर अहवाल सादर केले होते.

सदर प्रकरणांत सुनावणी चालु असतांना श्री. वहिदुल्ला पि. अजीमुल्ला मंसुरी यांनी या कार्यालयास दि. १८.०४.२०१६ रोजी अर्ज देवुन या कार्यालयाचे निदर्शनास आणुन दिले होते की, सदर प्रकरणांत मा. उच्च

न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे रिपीटीशन क्र. ३६०५/२०१६ मध्ये दि. ३१.०३.२०१६ रोजी खालील प्रमाणे आदेश दिले आहे.

ORDER

१. We have heard Mr. Mobin H. Shaikh, advocate appearing for the petitioner.

२. Mr. Shaikh, learned counsel submits that election of management of Wakf, namely, चMADRSA WA MA SJID TALIM-UL-ISLAM JAMIYAT AHLE HADISछ is required to be held in furtherance of notice dated २४-०४-२०१५

३. If the petitioner is interest person, he may move Wakf Authorities in that regard as would be permissible under the provisions of Wakf Act. In case such application is moved by the petitioner, the authority concerned shall decide the same on its merit and in accordance with law as expeditiously as possible.

४. Writ petition stand disposed of accordingly.

सदर प्रकरणांत श्री. अब्दुल सलाम मोहम्मद हदीस यांचे तर्फे ॲड. एस.बी.खान यांनी दि. ०९.०८.२०१६ रोजी या कार्यालयास अर्ज देवुन U/S ९-A CPC for preliminary issue of Jurisdiction साठी अर्ज दाखल केले होते त्यांमध्ये तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि. ०९.०८.२०१६ रोजी Application is rejected केले होते. श्री. अब्दुल सालम पि. मोहम्मद हदीस खान तर्फे ॲड. एस.बी.खान यांनी दि. २१.०९.२०१६ रोजी चालु असतांना यांनी अर्ज देवुन या कार्यालयाचे निदर्शनास आणुन दिले होते की, दि. ०९.०८.२०१६ रोजीचे रद्द केलेले अर्जाच्यसा विरूध्द मा. वक्फ न्याधिकरण, औरंगाबाद येथे अर्ज क्र. ४४/२०१६ अन्वये अर्जदार यांनी दावा दाखल केलेले आहे.

तसेच प्रकरणांत मा. वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे वक्फ अर्ज क्र. ४४/२०१६ मध्ये दि. २१.१२.२०१६ रोजी खालील प्रमाणे आदेश दिले आहे.

ORDER

१. Application is allowed.

२. Impugned order dated ०९.०८.२०१६ rejecting the application dated ०९.०८.२०१६ in Case No. ENQ४२/१३४/२०१३- ENQ४२/३१२/२०१४ passed by respondent No. १ the Chief Executive Officer of the Maharashtra State Board of Waqf, Aurangabad is hereby quashed and set aside as respondent No. १ the Chief Executive Officer of the Maharashtra State Board of Waqf, Aurangabad is directed to decide the said application on merit and pass reasoned order within a period of one month.

३. Both the parties are directed to appear before the Chief Executive Officer of the Maharashtra State Board of Waqf, Aurangabad on २७.१२.२०१६.

४. Under peculiar facts and circumstances of the case no order to the cost.

५. Application stands disposed of.

६. Dictated and pronounced in open court.

वरील प्रकरणांत ॲड. एस.बी. खान यांनी दि. २७.१२.२०१६ रोजी मा. कोर्टाचे आदेशान्वये अर्ज या कार्यालयास दाखल केले होते, सदर अर्जान्वये मा. पिटासीन अधिकारी यांनी दि. २७.१२.२०१६ रोजी सदर अर्जान्वये Application rejected on the point of Jurisdiction असे आदेश दिले होते व तसेच सदर संस्थेच्या व्यवस्थापण समितीची निवडणुक बाबत प्रकरण सुनावणी मध्ये प्रलंबित असुन सदर प्रकरण सध्या न्यायाप्रविष्ट आहे. प्रकरण निर्णयास्तव सादर

ठराव क्र. १२ यावर सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती वक्फ अधिनियम १९९५ चे कलम २७ नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी व एक सन्माननीय सदस्यांना अधिकार प्रदान करण्यांत येत असुन त्यांनी प्रकरणांत सुनावणी घेवून निर्णय घ्यावा. असे सर्वानुमते ठरले.

विषय क्रं. १३ दर्गाह हजरत सय्यद शाह तुराबुल हक्क रहे परभणी परीसरातील बोकूड कातडीचे निविदा बाबत.

दर्गाह हजरत सय्यद शाह तुराबुल हक्क रहे, परभणी परिसरात बोकूड कातडीची निविदा वर्ष २०१४-१५ मध्ये जनाब मोहम्मद इसाक मोहम्मद रज्जाक रा. फक्राबाद मोहल्ला पाथरी जि. परभणी यांना रक्कम २५,०७,०००/- मध्ये देण्यात आली होती त्यांची कालावधी संपल्यानंतर तीन वेळेस निविदा मागविण्यात आले परंतु सदर निविदा कोणीही घेत नसल्याने बोकूड कातडी अमानी मध्ये असून जिल्हा वक्फ अधिकारी परभणी त्याची व्यवस्था पाहत आहे.

सदर निविदा बाबत जिल्हा वक्फ अधिकारी परभणी यांनी दि. १५/४/२०१७ रोजी अहवाल सादर केले आहे की, त्यानुसार दि. ६/८/२०१५ ते ३१/३/२०१७ या (१९) महिण्या मध्ये बोकूड कातडी पासून वक्फ मंडळास फक्त रक्कम ४,३९,१९०/- रुपये प्राप्त झाले आहे कारण वर्ष २०१५ मध्ये दुष्काळी परिस्थिती होती व वर्ष २०१६ मध्ये नोट बंदीमुळे भाविकांनी कंदोरी कमी केली आहे तसेच कातडीचे भाव ही कमी झाल्यामुळे सदर टेंडर घेण्यास कोणीही पुढे

आले नाही. अर्जदार श्री. पाशा मुल्ला यांनी दि. २७/३/२०१७ रोजी अर्ज देऊन पुढील एक वर्षासाठी रक्कम ९.०० लाख रुपये मध्ये सदरचा ठेका घेण्याची तयारी दर्शवली आहे. परंतू महाराष्ट्र शासनानी ३ लाखाच्या वरील निविदासाठी ई टेंडरीग करणे अनिवार्य केले असल्यामुळे निर्णयास्तव सादर.

ठराव क्र. १३ यावर सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती महाराष्ट्र शासनाच्या धोरनात्मक निर्णयानुसार ३ लाखाच्या वरील कोणत्याही कामास ई-टेंडरींग करणे अनिवार्य आहे म्हणुन सदर कामाच्या ई-टेंडरींग द्वारे निवीदा मागवून त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांनी निर्णय घ्यावा. असे सर्वानुमते ठरले.

विषय क्रं. १४. **दर्गाह तुराबुल हक्क रहे परभणी येथील तीन गेट मध्ये लोखंडी टिन शेड बांधुन चप्पल जुते ठेवण्याचे स्टँड बांधणे व अर्जदारास मोफत सेवा करण्यची परवानगी मिळणे बाबत.**

दर्गाह हजरत सय्यद शाह तुराबुल हक्क रहे, परभणी संपुर्ण महाराष्ट्रात प्रसिध्द असुन दर्गाह मध्ये दर दिवशी हजारोंच्या संख्येने लोक दर्शन घेण्यासाठी व न्यास, व कंदुरी करण्यासाठी येतात आणि दर्गाह परिसरात बाबाच्या मजाराचे जवळ पाय-याच्या लगत जुते चप्पल सहीत जातात व बाबांच्या सि-हाना जवळ जुते चप्पलचे ढिग करतात त्यामुळे पवित्र दर्गाचे अपमान होत आहे. सदरील पवित्र स्थानचे अपमान होवू नये यासाठी अर्जदार सय्यद निसार मोहियोद्दिन रा. दर्गाह रोड परभणी यांनी विनंती केली आहे की, दर्गाहच्या तीन ही गेटच्या बाहेर बाजुने गेटच्या लगत लोखंडी टिन शेड बांधुन चप्पल जुते ठेवण्याची व्यवस्था वक्फ मंडळातर्फे करण्याची विनंती अर्जदार यांनी केली आहे. तसेच अर्जदारास मोफत सेवा करण्याची परवानगी देण्याची विनंती केली आहे. लोखंडी टिनशेड बांधण्याचे तीन कोटेशन जिल्हा वक्फ अधिकारी परभणी यांनी अहवाल सोबत सादर केले आहे.

सदर प्रकरणी दर्गाहचे दर्शन घेण्यासाठी गडबड करतात समाधी जवळ चप्पल व बुट सोडून दर्शन घेतात त्यामुळे समाधिचा अपमान होते हे टाळण्यासाठी अर्जदाराने मोफत सेवा करण्याची हमी घेतली असल्याने चप्पल स्टॅन्डच्या अंदाज पत्रकास मंजुरी देण्याची शिफारश मा. श्री. दुर्राणी अब्दुल्ला खान ऊर्फ बाबाजानी, सदस्य महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांनी त्यांचे पत्र दि. २३/२/२०१५ अन्वये केली आहे.

सदर प्रस्ताव तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समोर सादर करण्यांत आले होते सदर प्रस्ताव वक्फ मंडळाची बैठकीत ठेवण्याची तजविज

तत्कालीन मा. मुख्य कार्यकरी अधिकारी यांनी केली होती परंतु त्यानंतर वक्फ मंडळाची बैठक झाली नसल्याने सदर प्रस्ताव प्रलंबित आहे.
वरील प्रकरणांत जिल्हा वक्फ अधिकारी परभणी यांनी त्यांचे पत्र क्र. २२/१७ दि. ५/१/२०१७ अन्वये अहवाल सादर करुन दर्गाहच्या तीन गेटच्या बाहेर बाजुस चप्पल जुते ठेवण्यासाठी लोखंडी स्टॅन्ड वक्फ मंडाळाच्या खर्चाने बांधुन देणे व अर्जदारास मोफत सेवा करण्याची परवानगी देण्याची शिफारस जिल्हा वक्फ अधिकारी परभणी यांनी केली आहे. निर्णयास्तव सादर.

ठराव क्र. १४ यावर सविस्तर चर्चा होवून वरील दर्गाह परिसरात जुते व चप्पल चे लोखंडी स्टॅन्ड उभारण्यासाठी जिल्हा वक्फ अधिकारी परभणी यांचे मार्फत इतर लोकांनाही प्रोत्साहीत करावे व त्यासाठी त्यांच्याकडून दर्गेला काही उत्पन्न होण्याच्या दृष्टीने पर्यत्न करावे असे सर्वानुमते ठरले.

विषय क्रं. १५. दर्गाह पीर साहेब मौजे सौंदलगांव ता. अंबड जि. जालना ची सेवा इनाम जमीनीची भुसंपादन रक्कम मिळणे बाबत.

जिल्हा वक्फ अधिकारी जालना यांनी पत्र क्र. ८८/२०१६ दि. २९/१०/२०१६ अन्वये अहवाल सादर केले आहे त्यामध्ये दर्गाह पीर साहेब मौजे सौंदलगांव ता. अंबड जि. जालना च्या संबंधित इनाम जमीन सर्वे नं. २२ क्षेत्र २६ एकर ०१ गुंठे चे मुतवल्ली म्हणुन सय्यद असदुल्लाह बियाबानी यांचे नाव शासन राजपत्रात आहे दर्गाहचे क्षैत्र १०x८ फुट असुन मेन रोड पासुन अंदाजे २ किलो मिटर आत आहे सदर दर्गा मोकळयात जागेत असुन श्रध्दालू लोकांना बसण्यासाठी व थांबण्यासाठी कोणतीही सोय नाही दर्गाहची सेवा, दिवाबत्ती, संदल उर्स वगैरे जहूरूल हक्क पिता असदऊल्लाह बियाबानी हे करतात दर्गाहची मिळकत रस्ता चौपदरीकरण मध्ये संपादीत झालेली असून त्याचा मावेजा रक्कम २२,७७,५३५/- रुपये वक्फ मंडळाचे खाते जमा झालेले आहे. सदर दर्गाच्या विकासासाठी अर्जदार यांनी ईस्टीमेट व नकाशा सादर करुन रक्कम मिळणेस विनंती केल्यावरुन जिल्हा वक्फ अधिकारी जालना यांनी अहवाल सादर केले आहे.

निदर्शणास आणुन देण्यात येते की, दर्गाह पीर साहेब, मौजे सौंदलगांव ता. अंबड जि. जालना ची शासन राजपत्रात अनुक्रमांक ४५ वर असुन इनाम जमीन सर्वे नं. २२ पैकी जागा राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ (येडशी ते औरंगाबाद) चौपदीकरणसाठी संपादीत झाली असून त्याचा मावेजा रक्कम २२,७७,५३५/- रुपये पावती क्र. ९३४९४ दि. ९/८/२०१६ अन्वये वक्फ मंडळाचे खाते जमा झालेले असुन अर्जदार यांचे मागणी अर्ज पुढील निर्णयास्तव सादर.

ठराव क्र. १५ यावर सविस्तर चर्चा झाली तसेच सदर दर्गेच्या मुतवल्ली यांच्याशी ही वक्फ मंडळाच्या सभेच्या अध्यक्ष व सन्माननीय सदस्यांनी सविस्तर चर्चा केली व भुसंपादनाची वरील रक्कमेचे विनियोग व योजना त्यांना समजुन सांगण्यात आले चर्चेअंती वरील दर्गाह पीर साहेब मौजे सौंदलगांव ता. अंबड जि. जालना च्या संबंधित असलेली वक्फ मिळकत सर्वे नं. २२ पैकी राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ (येडशी ते औरंगाबाद) चौपदरीकरणासाठी संपादीत झालेले जमीनीचे मावेजा रक्कम २२,७७,५३५/- या रक्कमेतून वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ७२ नुसार ७% रक्कम वक्फ फंड म्हणुन वक्फ मंडळाच्या खात्यात जमा करुन उर्वरीत रक्कम कायदेशिर बाबी पडताळून संबंधीतांना अदा करण्यांत यावे. असे सर्वानुमते ठरले

विषय क्रं.१६. **दर्गाह मियॉ साहेब मौजे मापेगांव ता. परतुर जि. जालना ची सेवा इनाम जमीनीची भुसंपादन रक्कम मिळणे बाबत.**

सविनय सादर करण्यात येत आहे की, जिल्हा वक्फ अधिकारी जालना यांनी पत्र क्र. १६२/२०१७ दि. २१/०२/२०१७ अन्वये अहवाल सादर केले आहे त्यामध्ये दर्गाह मियांसाहेब मौजे मापेगांव ता. परतुर जि. जालना च्या संबंधित इनाम जमीन सर्वे नं. ८८ गट नं. १४ क्षेत्र ०३ हेक्टर ९६ आर जमीनीची नोंद शासन राजपत्रात अनुक्रमांक १३ वर असुन मुतवल्लीच्या रकान्यात मुस्लीम पंच मॅनेजींग अशी नोंद आहे. सदर वक्फ संस्थेची इनाम जमीन निम्न दुधना प्रकल्प बुडीत क्षेत्रात संपादीत झालेले आहे. सदर दर्गाह धरण मध्ये गेली असल्याने पुर्नवसन मोजणे अंतर्गत नवीन गावात १०० फुट जागा मस्जीद व १०० फुट जगा कब्रस्तानसाठी शासनाकडून मिळणार असल्याने भुसंपादनाची रक्कम कब्रस्तान व मस्जीद बांधण्यासाठी मिळणेस्तव अर्जदार हमीदखान अमीन खान पठाण व इतर व्यवस्थापन समितीचे सदस्यांनी अर्जासोबत ईस्टीमेट व नकाशा देऊन विनंती केल्याप्रमाणे सविस्तर अहवाल जिल्हा वक्फ अधिकारी जालना यांनी सादर केले आहे.

दर्गाह मियॉ साहेब, मौजे मापेगांव ता. परतुर जि. जालना ची नोंद शासन राजपत्रात अनुक्रमांक १३ वर असुन इनाम जमीन सर्वे नं. ८८ गट क्र. १४ पैकी जागा निम्न दुधना प्रकल्पासाठी संपादीत झाली असून त्याचा मावेजा रक्कम ५,८०,४८८/- रुपये पावती क्र. ९४१८७ दि. २०/९/२०१६ अन्वये वक्फ मंडळाचे खाते जमा झालेले आहे सदर रक्कम मस्जीद व कब्रस्तान बांधकामासाठी मिळणेस्तव अर्जदार यांचे मागणी अर्ज पुढील निर्णयास्तव सादर.

ठराव क्र. १६ यावर सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती दर्गाह मियॉसाहेब मौजे मापेगांव ता. परतूर जि. जालना च्या संबंधित असलेली इनाम जमीन सर्वे नं. ८८ गट क्र. १४ मधील निम्न दुधना प्रकल्पसाठी शासनाकडून संपादीत झालेली असून त्यांचे मोबदल्याची रक्कम रुपये ५,८०,४८८/- या रक्कमेतून वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ७२ नुसार ७% रक्कम वक्फ फंड म्हणुन वक्फ मंडळाच्या खात्यात जमा करुन उर्वरीत रक्कम कायदेशिर बाबी पडताळून संबंधीतांना अदा करण्यांत यावे. असे सर्वानुमते ठरले

विषय क्रं. १७ **दर्गाह शहीन्शाह वली साहब बीड च्या संबंधीत असलेली मालमत्तेत राष्ट्रीय महामार्ग क्रं. २११ मध्ये संपादीत बीड तरफ पिंगळे येथील सेवा ईनाम जमीनीचे मावेजा बाबत अवार्डला आव्हाण देणे बाबत.**

सविनय सादर करण्यात येत आहे की, राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ मध्ये मौजे बीड तरफ पिंगळे येथील दर्गाह शहिनशाह वली साहेब बीड सर्वे नं. २२,२३,३१,३२, व ९५ मधील इनामी जमीनीचा मावेजा रक्कम २,९७,७४,६४९/- रुपये मा. जिल्हाधिकारी बीड यांचे पी.एल.ए. मध्ये जमा करण्यांत आलेला आहे. सदर मावेजा रक्कम मिळणेस्तव अनेक दावेदार असल्याने उपजिल्हाधिकारी (सामान्य) बीड यांनी दि. १८/३/२०१७ खालील प्रमाणे आदेश दिले आहे.

१) मौजे बीड तरफ पिंगळे येथील स.न. २२,२३,३१,३२, व ९५ या जमीनी दर्गाह हजरत कोचक शाह वली च्या जमीनी असुन त्याच्या मावेजा वाटपाची परिगणना शासन निर्णय क्र. डीईव्ही-२३७६/२९९७३/ल दि.१७/५/१९८० नुसार सोबतच्या विवरणपत्र-अ मध्ये करण्यांत येत आहे.

२) मा. विभागीय आयुकत औरंगाबाद यांची सदर आदेश व विवरण्पत्र-अ मधील व्याजाच्या रक्कमेच्या परिगणनेस अंतिम मान्यता प्राप्त झाल्यनतर सदर रक्कम धनादेशाने मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ औरंगाबाद यांचेकडे शासन निर्णय क्र.डिईव्ही-२३७६/२९९७३/ल-४ दि. १७/५/१९८० नुार वाटपासाठी वर्ग करण्यांत यावी.

वरील अवार्डला मा. उच्च न्यायालय, खंडपिठ औरंगाबाद येथे Challenge करण्यासाठी वक्फ मंडळाचे पॅनल ॲव्होकेट ची नियुक्तीसाठी प्रकरण पुढील निर्णय व आदेशास्त सादर.

ठराव क्र. १७ यावर सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती सदरच्या प्रकरणांत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपिठ औरंगाबाद येथे अवार्डला अव्हान दयावे त्यासाठी औरंगाबाद येथील विधी तज्ञ जनाब एस.एस. काझी साहेब यांना नियुक्त करावे असे ठरले.

(नविन विषय पत्रिका)
सियानत विभाग,

महाराष्ट्र शासन अल्प संख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांनी वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ९७ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन खालील प्रमाणे आदेश निर्गमित केलेले आहे.

विषय क्रं. १८ **हजरत दाऊद औलिया मगरीबी यांच्या संबंधीत असलेल्या वक्फ मिळकतीतील भाडे करुन श्री. दिलीपी चितलांगे यांची मालमत्ता वक्फ मंडळाच्या ताब्यात घेणे बाबत.**

दर्गाह दाऊद औलिय मगरीबी, औरंगाबाद या वक्फ संस्थेच्या मालकीची औरंगाबाद शहरातील सि.टी.एस. क्र. १२५०३ मधील ४४१८.३१ चौ.मि. वक्फ जमीनी प्रकरणी तत्कालीन प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबद व श्री. दिलीप चितलांगे आणि श्री. कुलभुषण अग्रवाल यांच्या दरम्यान न्यायालया बाहेर दि. २१/१०/२०१६ रोजी करण्यांत आलेल्या भाडेपट्टा करार हा वक्फ अधिनियम १९९५ मधील कलम ३२(२)(जे) व कलम ५६ मधील तरतुदींचे उल्लंघन करुन तसेच The Wakf Properties Lease Rules, २०१४ मधील नियम ४ ते १२ अन्वये व The Maharashtra Wakf Rules २००३ च्या नियम २५ व २६ अन्वये विहित करण्यांत आलेल्या कार्यपध्दीचे अनुपालन न करता व यासाठी तत्कालीन प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी सक्षम नसतांना व त्यांना या संदर्भात कोणतेही अधिकार प्राप्त नसतांना करण्यांत अलेला असल्याने सदरचा करार संबंधित वक्फ संस्थेच्या हिताविरुध्द असल्याने व वक्फ न्यायाधिकरणाचे बेकायदा घोषीत केलेला असल्याने व वक्फ न्यायाधिकरणाचा निर्णय मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपिठ, औरंगाबाद यांनी कायम करुन करार करणा-या विरुध्द अत्यंत कडक ताशेरे ओढलेले असल्याने सदर भाडेकरार रद्द करुन सदरची मालमत्ता वक्फ मंडळाकडे पुर्ववत करण्या विषयी आवश्यक ती कायदेशिर कार्यवाही करण्यासाठी राज्य शासनाने वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ९७ अन्वये त्यांना प्राप्त अधिकाराचा वापर करुन दि. ११/८/२०१७ च्या निर्णय अन्वये या कार्यालयास निदेश दिलेले आहे. शासन निर्णय क्र. : वक्फ २०१७ /प्र.क्र.१६५/१/कार्यासन-४ दि. ११/८/२०१७ नुसार करावयाची कार्यवाही बाबत निर्णय व आदेशास्तव सादर.

ठराव क्र. १८ यावर सविस्तर चर्चा झाली तसेच प्रभारी जिल्हा वक्फ अधिकारी औरंगाबाद यांना सभे समोर बोलावून हजरत दाऊद औलिया मगरीबी औरंगाबाद च्या संबंधित असलेल्या वक्फ मालमत्ता सिटीएस क्र. १२५०३ क्षेत्र ४४१८.३१ चौ.मि.या जमीनीचा महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार ३ अठवडयाच्या आत

ताबा घेण्यासाठी उपाय योजना करावी व तसा अहवाल वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नियमितपणे दयावे असे सर्वानुमते ठरले.

विषय क्रं. १९ **सैफी मस्जीद, सैफी जुब्ली स्ट्रीट मुंबई चे बांधकामास नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत.**

प्रादेशिक वक्फ अधिकारी मुंबई यांनी पत्र क्र. एसएनटी/१२३/२०१७ दि. २५/७/२०१७ अन्वये अहवाल सादर केले आहे त्यामध्ये सैफी मस्जीद, सैफी जुब्ली स्ट्रीट मुंबई-०३ ही संस्था वक्फ मंडळात क्र. MSBW/MUM/३१३/२०१४ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदर मस्जीद जुनी व जिर्ण झालेली असुन १०० वर्षा पुर्वीची आहे मस्जीदच्या भिंती कोसडलेले असल्याने त्याला टेका दिलेला आहे सदर मस्जीद मध्ये सर्व बोहरी समाजाचे लोक हजारोंच्या संख्याने नमाज अदा करतात परंतु मस्जीदच्या जिर्ण अवस्थेमुळे नमाजी लोकांच्या जिवीतास धोका निर्माण झालेला आहे. सदर मस्जीदच्या पुर्व बाजुला महिलांना नमाजसाठी जागा आहे त्याचे पिल्लर व मिनार मध्ये दरार पडलेली आहे सदर मस्जीदच्या तळ मजल्यास लोखंडी चेनल चे सपोर्ट लावण्यात आले आह तसेच महिलासाठी येणारे मार्ग व पहिल्या मजल्याचे प्रवेश ही सध्या बंद करण्यांत आले असल्याचे नमुद केले आहे.

सदर वक्फ संस्थेस एकुण पाच सिटी सर्वे नं. आहे १) सिटीएस क्र. ३५७८ क्षेत्र २७६.७६ चौ.मि. २) ३५७९ क्षेत्र ८१६.९ चौ.मि. ३) ३५८० क्षेत्र १८०.६ चौ.मि. ४) ३५८८ क्षेत्र १५४.६८ चो. मि. ५) ३५८९ क्षेत्र १२५.३३ चौ.मि. आहे. सदर मस्जीदची दुकाने होती ती संस्थेने काढून त्याचा समावेश मस्जीदचे विस्तार मध्ये करण्यात येणार असल्याचे शपथपत्र दिले आहे सदर मस्जीदचे बांधकाम विश्वस्त व वर्गणी द्वारे होणार आहे. सदर मस्जीद तीन मजली बांधण्यात येणार असुन त्याचे पुनर्रबांधणी साठी प्लॅन व इस्टीमेटची प्रत देऊन या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळणेस अर्जदार यांनी विनंती केल्यावरुन प्रादेशिक वक्फ अधिकारी मुंबई यांनी त्यांचे अहवाल सादर केले आहे. तसेच महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय, मुंबई-३२ यांनी वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ९७ अन्वये सदर प्रकरण बांधकाम नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत निर्देश दिलेले आहेत.
सदर प्रस्ताव पुढील निर्णय व आदेशास्तव सादर.

ठराव क्र. १९ यावर सविस्तर चर्चा करण्यांत आली चर्चेअंती सैफी मस्जीद, सैफी ज्युब्ली स्ट्रीट मुंबई च्या विकास आराखडयाला व बांधकामाला शासनाच्या आदेशानुसार मान्यता देण्या पुर्वी दि.१५/०५/२०१८ रोजी सर्व सदस्यांनी स्थळ पाहणी करावी व त्यांच्या अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी असे सर्वानुमते ठरले.

विषय क्रं. २० **दर्गाह ए गौसिया ट्रस्ट फकीर वाडी, जोगेश्वरी पश्चिम मुंबई या वक्फ संस्थेच्या मालकीची मालमत्ता बेकायदेशीर मालमत्ता मध्ये बांधकामास जबाबदार असणा-या ट्रस्टी व विकास का विरुध्द वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५२ ए १ मधील तरतुदीनुसार गुन्हा नोंद करणे बाबत.**

दर्गाह-ए-गौसीया ट्रस्ट, फकीरवाडी जोगेश्वरी (प) मुंबई च्या संबंधित मिळकतीच्या प्रकरणांत खालील प्रमाणे शासन निर्णय क्र. विपप्र.२०१८/प्र.क्र.४९/कार्यासन-४ मंत्रालय, मुंबई दि.१/३/२०१८ या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

प्रादेशिक वक्फ अधिकारी मुंबई यांनी शासनास सादर केलेल्या अहवालनुसार दर्गाह-ए-गौसीया ट्रस्ट फकीरवाडी, जोगेश्वरी (प) मुंबई ही संस्था वक्फ मंडळात नोंदणी क्र. MSBW/MUM/ २४७/२०११ दि.८/१२/२०११ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था असुन प्रादेशिक वक्फ अधिकारी मुंबई यांचे अहवालनुसार दर्गाह-ए-गौसीया ट्रस्ट च्या बाजुला बांधकाम सुरु असतांना त्याची माहिती देणे बाबत वक्फ संस्थेचे विश्वस्त सहकार्य करत नाही. सदर बांधकामासाठी वक्फ मंडळाने कोणतीही परवानगी दिलेली नाही. सदर वक्फ मालमत्तेवर बेकायदेशिर बांधकाम सुरु असल्याने व वक्फ संस्थेचे विश्वस्त सहकार्य करत नसल्याने वक्फ संस्थेचे विश्वस्त हे निषक्रिय असुन मोल्यवान मालमत्तेचे संरक्षण करण्यास असमर्थ दिसुन येते त्यामुळे वक्फ मालमत्तेवर बेकायदेशिर बांधकाम सुरु असल्याचे आढळून आल्यास बांधकामाचाी सविस्तर चौकशी करुन बांधकामास जबाबदार असणा-या ट्रस्टी व विकासका विरुध्द वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५२-A (१) मधील तरतुदीनुसार तसेच भारतीय दंड विधानातील संबंधित तरतुर्दीनुसार संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्याचे व संबंधित ट्रस्टींना अपात्र ठरविण्या विषयी व संबंधित वक्फ संस्था वक्फ मंडळाच्या थेट नियंत्रणाखाली घेण्या विषयी वक्फ अधिनियम १९९५ मधील तरतुदीनुसार कायदेशिर कार्यवाही त्वरीत सुरु करणे बाबत महाराष्ट्र शासनाने वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ९७ अन्वये वक्फ मंडळास निर्देश दिलेले आहे.

तसेच कक्ष अधिकारी, अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचे पत्र दि. १०/४/२०१८ अन्वये तहसीलदार अंधेरी यांनी दि. ६/३/२०१८ रोजी शासनास दिलेल्या अहवालनुसार दर्गाह-ए-गौसीया ट्रस्ट फकीरवाडी, जोगेश्वरी (प) मुंबई च्या संबंधित असलेली वक्फ मिळकत सर्वे नं. ३५ हिस्सा नं. १६, सिटीएस क्र. ४५ क्षेत्र १४७५ चौ. मिटर्स च्या ७/१२ उता-यावर मेसर्स सहयोग होम्स अशी नोंद असल्याने संभ्रम निर्माण झालेला आहे त्या करीता भुमी अभिलेख अधिका-या मार्फत सदर मिळकतीची मोजणी व चिन्हांकन करुन घेवून क्षेत्र १४७५ चौ.मि. भु-भागाचा स्वतंत्र ७/१२ तयार करुन त्याचे मालक सदरी वक्फ संस्थेच्या नावाची व "प्रतिबंधीत सत्ता प्रकार" अशी नोंद घेण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती केली आहे. वरील प्रकरण निर्णयास्तव सादर

ठराव क्र. २० यावर सविस्तर चर्चा झाली चर्चेअंती दर्गाह ए गौसिया ट्रस्ट फकीर वाडी, जोगेश्वरी पश्चिम मुंबई या वक्फ संस्थेच्या मालकीची मालमत्ता बेकायदेशीर मालमत्ता मध्ये बांधकामास जबाबदार असणा-या ट्रस्टी व विकास का विरुध्द वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५२ ए १ मधील तरतुदीनुसार गुन्हा नोंद करणे पुर्वी दि.१५/०५/२०१८ रोजी सर्व सदस्यांनी स्थळ पाहणी करावी व त्यांच्या अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी असे सर्वानुमते ठरले.

सदर संस्थेच्या संबंधित असलेली वक्फ मिळकत सर्वे नं. ३५हिस्सा नं. १६, सिटीएस क्र. ४५ क्षेत्र १४७५ चौ. मिटर्स च्या ७/१२ उता-यावर मेसर्स सहयोग होम्स अशी नोंद असल्याने संभ्रम निर्माण झालेला आहे त्या करीता भुमी अभिलेख अधिका-या मार्फत सदर मिळकतीची मोजणी व चिन्हांकन करुन घेवून क्षेत्र १४७५ चौ.मि. भु-भागाचा स्वतंत्र ७/१२ तयार करुन त्याचे मालक सदरी वक्फ संस्थेच्या नावाची व "प्रतिबंधीत सत्ता प्रकार" अशी नोंद घेण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्यांत यावी असे सर्वानुमते ठरले.

विषय क्रं. २१ **हजरत बाबा अब्दुल्ला शाह वली दर्गाह ट्रस्टवर प्रशासकीय व २ महिन्यात निवडणुक घेणे बाबत**

सविनिय सादर करण्यात येत आहे की, श्री. अरविंद शेटे, मा.अवर सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे शासन निर्णय दि. ०८.०३.२०१८ अन्वये वक्फ संस्था दर्गा व कब्रस्तान बाबा अब्दुल्ला शाह नौशाही कादरी रहे. कामठी, ता. कामठी, जि. नागपुर यांचा उर्स नोव्हेंबर महिन्यात असतो. सदर बाब विचारत घेता सदर ट्रस्टवर तहसिलदार/उपविभागीय अधिकारी अशा शासकीय अधिकाऱ्याची प्रशासक म्हणुन नियुक्ती करण्यात यावी व सदर ट्रस्टच्या व्यवस्थापन समितीची निवडणुक घेण्याविषयीची सर्व कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करून या आदेशाच्या दिनांकपासून २ महिन्याच्या आत सदर निवडणुक घेण्यात यावी, असे वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ९७ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास निर्देश दिलेले आहेत.

प्रकरणांत श्री. रविंद्र खजांजी, अति. जिल्हादंडाधिकारी, नागपुर यांनी आदेश क्र.अजिंद/गृह/कक्ष-१४(४)/सं.क्र.४५/कावी- ८७/२०१८ दि. ०२.०४.२०१८ अन्वये वक्फ संस्था दर्गा व कब्रस्तान बाबा अब्दुल्ला शाह नौशाही कादरी रहे. कामठी, ता. कामठी, जि. नागपुरच्या व्यवस्थापन समितीवर तहसिलदार कामठी यांची प्रशासक म्हणुन नियुक्ती करणे बाबत शासन निर्णय दि. ०८.०३.२०१८ नुसार प्रशासक म्हणुन तहसिलदार कामठी यांची नियुक्ती केलेली असून वक्फ संस्थेची निवडणूक प्रक्रिया आदेशाच्या २ महिण्याचे आत

पुर्ण करून अहवाल सादर करणे बाबत मा. अति.जिल्हादंडाधिकारी, नागपुर यांनी तहसिलदार कामठी यांना आदेश दिलेले आहे.

तरी वरील शासन निर्णय वक्फ मंडळाच्या बैठकीत मा. सदस्य समोर ठेवणे योग्य होईल. पुढील आदेशास्त सादर.

ठराव क्र. २१ यावर सविस्तर चर्चा करण्यांत आली चर्चेअंती शासनाच्या आदेशानुसार नागपुरचे अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी तहसीदार कामटी यांना प्रशासक म्हणुन नियुक्त केले आहे व सदर संस्थेची मान्यता प्राप्त योजनेनुसार कामटी येथील रहिवाश्यांची मतदार यादी तयार करुन दोन महिण्यांचे आत निवडणुक घेण्यात यावी या साठी नागपुर येथील ॲडव्होकेट जनाब गुलाम मोहम्मद साहेब यांना निवडणुक अधिकारी व जनाब कुतुब जफर साहेब यांना सहाय्यक निवडणुक अधिकारी नियुक्त करण्यांत यावे याची तातडीने अमलबजावणी करावी असे सर्वानुमते ठरले.

विषय क्रं. २२ **महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सरळ निगराणीत असलेल्या वक्फ संस्थांच्या विविध कामाचे ई टेंडरींग व निविदा द्वारे निविदा प्रसिध्द करणे व त्यावर निर्णय घेणे बाबत अधिकार प्रदान करणे.**

१) दर्गाह हजरत हाफेज सय्यद अलाउद्दीन रैाना पराडा ता. अंबड जि. जालना परिसरातील बोकुड कातडी चे वार्षिक निविदा बाबत.

२) दर्गाह हजरत तुराबुल हक्क साहेब, परभणी गुड फुटाणे दुकानचे वार्षिक निविदा बाबत

३) दर्गाह हजरत हाफेज सय्यद अलाउद्दीन रैाना पराडा ता. अंबड जि. जालना परिसरातील विश्रामगृहचे वार्षिक निविदा बाबत.

४) दर्गाह हजरत बाबाशाह मुसाफीर रहे पानचक्की औरगाबाद इंट्री तिकिट विक्री वार्षिक निविदा बाबत

५) जामा मस्जीद औरंगाबाद आमखास मैदान ईद बाजार साठी वार्षिक निविदा बाबत.

६) उस्मानपुरा औरंगाबाद येथील वक्फ मिळकती मधील विहीरीचे पाणी चे वार्षिक निविदा बाबत.

७) दर्गाह हजरत शाहनूर हमवी रअ. येथील फुल बैठकीचे दुकानाचे वार्षिक निविदा बाबत.

ठराव क्र.२२ यावर सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती शासनाच्या धोरनात्मक निर्णयानुसार ३ लाखाच्या वरील कामांचे ई-टेंडरींग द्वारे निविदा काढण्यात यावे व त्यापेक्षा कमी असलेल्या कामांचे निविदा प्रसिध्द करुन त्यावर निर्णय घेण्यासाठी वक्फ

अधिनिय १९९५ चे कलम २७ नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांना अधिकार प्रदान करण्यांत येत आहे असे सर्वानुमते ठरले.

विषय क्रं. २३ **महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या सरळ निगराणीत असलेल्या वक्फ संस्थांच्या वक्फ मालमत्ते वरील भाडेकरु व नुझुलदारा कडुन वसुलीचे धोरण ठरविणे बाबत.**

सविनय सादर करण्यात येते की, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद च्या सरळ निगराणीत असलेल्या वक्फ मालमत्ते वरील भाडेकरु नुझुलदार यांना अत्यअल्प भाडे व नुझुल असल्यामुळे भारत सरकार ची अधिसुचना दि. ५ जुन २०१४ व २५ ऑगस्ट २०१५ नुसार सर्व संबंधीत भाडेकरु व नुझुलदार यांना भाड्यात वाढ करण्यासाठी समज देण्यात आलेली आहे. जिल्हा निहाय्य तपशील खालील प्रमाणे आहे.

अ. क्रं.	जिल्हा	नोटीस दिलेली संख्या (भाडेकरु)
१	औरगाबाद	४०५
२	जालना	६३
३	परभणी /हिंगोली	१६९
४	नांदेड	२०७
५	बीड	५०
६	लातूर	६३
७	उस्मानाबाद	८३
	एकुण	१०४०

वरील प्रमाणे भाडेकरु व नुझुलदार यांना नोटीसा देऊनही त्यांच्या कडुन कोणत्याही प्रकारचे शासनाच्या धोरणात्मक निर्णय नुसार भाडे पट्याचे व नुझुल पट्टयाचे नुतनीकरण कण्यात प्रतिसाद मिळत नाही म्हणून तत्कालीन मु.का.अ. यांनी २०१५ पर्यंत जुन्या दरा प्रमाणे भाडे वसुल करण्याचे आदेश दिले होते तद्दनंतर चे भाडे अद्याप संबंधीता कडे थकीत असुन वसुली बंद झालेली आहे. या बाबत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळांनी वसुली संबंधी धोरणात्मक निर्णय घेणे आवशयक आहे. निर्णयास्तव सादर.

ठराव क्र. २३ यावर सविस्तर चर्चा करण्यांत आली चर्चेअंती महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सरळ निगराणीत असलेल्या वक्फ संस्थांच्या मालमत्तेवरील भाडेकरु व नुझुलदाराकडून वसूली नियमितपणे सुरु ठेवावी मात्र भारत सरकारची अधिसुचना दि. ५/६/२०१४ व २५/८/२०१५ नुसार संबंधितांना

भाडेकरुची मुद्दत संपल्याने व नुतणीकरण ना दिल्याने या विभागाचे पत्र क्रं मरावम/अतियात-७५/२०१८/१४५५/ दिनांक ०६/०३/२०१८ अन्वये जिल्हा वक्फ अधिकारी बीड यांना देवुन आदेशीत करण्यात आलेले होते की मौजे.समनापुर येथे जावुन सर्वे नं. ५५ क्षेत्र ९ एकर २३ गुंठेचा ताबा घेवुन ताबा पावतीसह सविसतर अहवाल सादर करावा. सदर अहवाल अप्राप्त आहे.
तात्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ श्री. एन.डी.पठण यांचे कार्यकाळात सदर संस्थाची सेवा इनामी जमीन सर्वे नं. ५५ मधुन भाडेने दिल्याने मा.श्री. कृष्णा भोगे आयोग यांच्या चौकशीत सदर मुद्दा असुन या बाबत नुकताचं सदंर्भीय आदेश क्रं मरावम/अतियात-१३०४/२०१३ दिनांक २०/०३/२०१३ ची छायाकीतप्रत शासनास सादर करण्यात आलेली आहे. आदेशास्तव सादर

ठराव क्र. ४९ यावर सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती मा. महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण यांच्या कडील आदेशानुसार वक्फ अधिनियम १९९५ चे कलम २७ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी व कोणताही एक सदस्याची संपर्क करुन त्यांना बरोबर घेऊन सुनावणी घेऊन निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहे. अस सर्वानुमते ठरले.

विषय क्रं. ५० **दर्गाह हजरत अमिनूल हक्क मस्जीद व कब्रस्तान, सर्वे नं. ९४ औरंगाबाद मुतवल्ली काढून टाकणे बाबत.**

सविनय सादर करण्यात येते की, दर्गाह मस्जीद अमीनुल हक्क ॲण्ड ग्रेवयाड्र औरंगाबाद हि वक्फ संस्थ असुन याची नोंद वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३६ नुसार करण्यात आलेली असुन ज्याचा नोंदणी क्रं मरावम/औरंगाबाद/२२४/२०११ असा आहे. या कार्यालयाचे आदेश क्रं मरावम/अतियात-७३/७३७/२०१४ दिनांक ०१/०२/२०१४ अन्वये सदरर संस्थाची सेवा व देखरेखसाठी श्री. सय्यद ईल्हाम इमाम फिरदोसी यांनी नेमणुक करण्यात आलेली आहे.
वक्फ संस्था दर्गाह मस्जीद अमीनुल हक्कम सेट्रल बस स्टेंड औरंगाबाद चा प्रकरण मा. वक्फ न्यायाधिकरण औरंगाबाद येथे अर्ज

क्रं १५/२०११ या प्रकरणाचे निर्णय दिनांक १०/१२/२०१२ रोजी अर्जदार सय्यद इलहाम इमाम फिरदोसी गुमाल हेसैन फिरदोसी यांच्या बाजुने झालेला आहे. सदरील संस्था मधुन मस्जीद ची व्यवस्था करीत असल्याचे निदर्शनास आले आहे १. हाजी एकबाल कुरेशी २. सलाऊद्दीन मेनोद्दिन रा. औरंगाबाद हे करीत आहे कारण की आपण स्वय घोषित असल्याने आपणांस सुचित करण्यात येते की सदर मस्जीद चा ताबा मुतवल्ली यांना सदरची नोटीस मिळाल्या पासुन एक माहिन्याच्या आंत देण्यात यावा असे आपल्याला सुचित करण्यात येत आहे दरम्यान मस्जीदच्या सर्व कारभार उत्पन्न व खर्चयाची तफशील इमाम मोजन चे हदियाची तफशील लाईट बील पाणी पटी व इतर सर्व खार्च्याची तफशील अभिलेखसह या कार्यालयास ताबडतोब जमा करावे अशी नोटीस क्रं ३६६९/२०१५ दिनांक ३०/०७/२०१५ रोजी देण्यात आली होती.

तसेच जिल्हा वक्फ अधिकारी औरंगाबाद यांनी दिनांक ०४/१०/२०१७ रोजी पण १. हाजी एकबाल कुरेशी २. सलाऊद्दीन मेनोद्दिन रा. औरंगाबाद यांना ताबा सुपुर्द करावे व प्रक्रीयेला संपुर्ण सहाकार्य कराचे असे कळविले होते. वक्फ संस्था दर्गाह मस्जीद अमिनुलहक्क कब्रसतान सिटीएस क्रं २०७२५ औरंगाबाद चा ताबा घेण्यासाठी जिल्हा वकफ अधिकारी दिनांक ०९/१०/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता सदर संस्थावर सर्व अभिलेखसह उपस्थित होते पण १. हाजी एकबाल २. सलाऊद्दीन मोईनोद्दीन हाजर झाले नाही ज्यामुळे ताबा घेण्यात आला नाही ज्यामळे वरील दोघे इस्म गैर हाजर असल्यामुळे सदरील ठिकाणी पंचा समोर पंचनामा करण्यात आला. सदरील संस्थाचे कमेटीचे सचिव अध्यक्ष यांनी मा. वक्फ न्यायाधिकरण औरंगाबाद येथे दावा दाखल केले जे प्रलंबीत आहे. मंडळाचे निर्णयास्तव सादर

ठराव क्रं. ५० **सदरचा विषयी पुढील बैठकी मध्ये ठेवण्यात यावा.**

सियानत विभाग

विषय क्रं. ५१ **दर्गाह हाफेज सय्यद अलाऊद्दिन साहब रहे, मौज रौना पराडा ता. अंबड जि. जालना परिसरात पाणीची व्यवस्था करणे बाबत.**

दर्गाह हाफेज सय्यद अलाऊद्दिन साहब रहे, मौजे रौना पराडा ता. अंबड जि. जालना या वक्फ संस्थे व्यवस्थापन महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे असून दर वर्षी दर्गाह परिसरात टँकर द्वारे पाणीची व्यवस्था केली जाते. सध्या तापमान

वाढल्याने दर्गाह परिसरात पाणीची टंचाई झालेली असुन टँकर द्वारे पाणीची व्यवस्था करण्यासाठी मान्यता देणे बाबत आदेशास्तव सादर.

ठराव क्रं. ५१ **सदरचा विषयी पुढील बैठकी मध्ये ठेवण्यात यावा.**

विषय क्रं. ५२ **कब्रस्तान ट्रस्ट, मौजे शेगांव ता. शेगांव जि. बुलढाणा च्या संबंधित मिळकतीचा भुसंपादन मावेजा बाबत**

कब्रस्तान ट्रस्ट, मौजे शेगांव ता. शेगांव जि. बुलढाणा हि संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार बी-२०४ अन्वये नोंदणीकृत असुन वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४३ नुसार क्र. MSBW/BLD/१०७/२००९ दि. २०/४/२००९ अन्वये रितसर नोंदणी करण्यात आलेली आहे. सदरील कब्रस्तानच्या संबंधित मिळकत शेगांव विकास आराखडा शेगांव बाळापूर राज्य महामार्ग क्र. ११८ आनंद विसावा ते मुरारका शाळा या रस्त्याचे २४ मिटर लांबीत चौपदरीकरणासाठी संपादीत करण्यांत येत असल्यामुळे सदर जागा संपादीत करण्यांत येऊ नये म्हणुन या कार्यालयाने पत्र क्र. मरावमं/एसएनटी-७२१/६८८३/२०१४ दि. ३/१२/२०१४ व पत्र मरावमं/एसएनटी-१३४/१२५७/२०१८ दि. २३/४/२०१८ अन्वये संबंधितांना सुचना दिलेले आहे.

सदर कब्रस्तान मधील संपादीत क्षेत्र २२८.२५ चौ.मिटस जागाचे प्रस्तावास मंजुरी मिळालेली नसल्याने व भुसंपादनाची कार्यवाही न झाल्यामुळे रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम अपुर्ण आहे मा. उच्च न्यायालयाचे आदेशान्वये विकास आराखडयांतर्गत कामे विहीत कालावधीत पुर्ण करण्याच्या दृष्टीने सदर जागेच्या प्रस्तावास मंजुरी देवून आदेश निर्गमित करण्याची विनंती विभागीय आयुक्त, अमरावती यांनी केली आहे प्रस्ताव पुढील निर्णय व आदेशास्तव सादर.

ठराव क्रं. ५२ **सदरचा विषयी पुढील बैठकी मध्ये ठेवण्यात यावा.**

विषय क्रं. ५३ **दर्गाह पिर शाह चिश्ती ट्रस्ट, संगमनेर ता. संगमनेर जि. अहमदनगर सर्वे नं. ६९ पैकी क्षेत्र २४९ आर जमीनीचे भुसंपादन बाबत.**

दर्गाह पिर शाह चिश्ती ट्रस्ट, संगमनेर ता. संगमनेर जि. अहमदनगर हि संस्था महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार बी-८१ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असुन ही कलम ४३ अन्वये क्र. MSBW/ADR/१११/२००८ अन्वये रितसर नोंदणी करण्यांत आलेली आहे. सदर संस्थेच्या संबंधित असलेली वक्फ मिळकत स.न. ६९ पैकी २४९

आर जमीन राष्ट्रीय महामार्ग क्र. ५० साठी संपादीत झालेली असुन त्याच्या मोबदल्याची रक्कम ६,५३,६०,९८२/- चा अवार्ड मंजुर करण्यांत आलेला आहे.

वक्फ अधिनियम १९९५ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्रातील सर्व वक्फ संस्था व त्यांच्या संबंधित असलेली वक्फ मालमत्ता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या अधिपत्त्याखाली येतात म्हणुन संपादीत जमीनीचा मावेजा रक्कमेचा धनादेश महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे नावाने पाठविणे बाबत या कार्यालयाचे पत्र क्र. मरावमं/एसएनटी-२१०/ /२०१८ दि. २६/०४/२०१८ अन्वये मा. उपविभागीय अधिकारी संगमनेर जि. अहमदनगर यांना सुचना देण्यात आलेली आहे. प्रकरण पुढील निर्णय व आदेशास्तव सादर.

ठराव क्रं. ५३ **सदरचा विषयी पुढील बैठकी मध्ये ठेवण्यात यावा.**

विषय क्रं. ५४ **दर्गाह सुलतान बीबी साहेबा, दर्गाह महेबुब बीबी साहेब, दर्गाह खैरीयत खान, मस्जीद व कब्रस्तान मौजे हतवन ता. जि. जालना च्या संबंधित मिळकतीचा भुसंपादन मावेजा बाबत.**

दर्गाह सुलतान बीबी साहेबा, दर्गाह महेबुब बीबी साहेब, दर्गाह खैरीयत खान, मस्जीद व कब्रस्तान मौजे हतवन ता. जि. जालना ची नोंद शासन राजपत्र दि. २१/६/१९७३ पार्ट-बीचे अनुक्रमांक १ वर असुन वक्फ संस्थेच्या संबंधित असलेली सेवा इनाम जमीन सर्वे नं. ३,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,
१९,२०,२१,२२,,२३,२४,५५,५९,६०,६१,६२,६३,६४,६५,६६, ६७ या जमीनी बुडीत क्षेत्रात गेलेली असुन त्याचा मावेजा रक्कमेचा धनादेश महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे नावाने पाठविणे बाबत या कार्यालयाने पत्र क्र. मरावमं/एसएनटी-१३२/१५१५/२०१७ दि. २४/५/२०१७ अन्वये मुख्य अभियंता जलसंपदा विभाग गोदावरी महामंडळ, जालना रोड औरंगाबाद यांना सुचना दिलेली आहे. परंतु अद्याप भुसपादन जमीनीचा मावेजा रक्कमेचा धनादेश या कार्यालयास प्राप्त झालेला नाही. प्रकरण पुढील निर्णय व आदेशास्तव सादर.

ठराव क्रं. ५४ **सदरचा विषयी पुढील बैठकी मध्ये ठेवण्यात यावा.**

विषय क्रं. ५५ **पाथरी ता. पाथरी जि. परभणी येथील ईदगाह सर्वे नं. ६७ माळीवाडा, चे इदगाह मैदान विकसीत करणे बाबत.**

ईदगाह, पाथरी ची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ५/९/१९७४ पार्ट-अ च्या अनुक्रमांक १५३ वर असुन मुतवल्लीचे रकान्यात गुलाम दस्तागीर अब्दुल

कादरी यांचे नावाची नोंद असून वक्फ संस्थेचे क्षेत्रफळ ३४०x७०० फुट आहे. सदर ईदगाह मैदानचे विकसीत कामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत मुख्याधिकारी नगर परिषद, पाथरी यांनी त्यांचे पत्र क्र. एमसीपी/सिव्हील/७६७/२०१८ दि. ५/३/२०१८ विनंती केल्याप्रमाणे जिल्हा वक्फ अधिकारी परभणी यांनी शिफारशीनुसार नगर परिषद प्रभाग क्र. (१) पाथरी अंतर्गत ईदगाह मैदान विकसीत करणे सुरक्षा भिंती व ओटा व इत्यादी कामास या कार्यालयाचे पत्र क्र. मरावमं/एसएनटी-११८/११०३/२०१८ दि. १६/३/२०१८ अन्वये कार्योत्तर मंजुरी देण्यात आलेली आहे. पुढील निर्णय व आदेशास्तव सादर.

ठराव क्रं. ५५ सदरचा विषयी पुढील बैठकी मध्ये ठेवण्यात यावा.

विषय क्रं. ५६ आशुरखाना व तकीया मौजे बोरफळ ता. औसा जि. लातूर च्या संबंधित सर्वे नं. ७० पैकी जमीनीचा भुसंपादन मावेजा मिळणे बाबत.

सविनय सादर करण्यात येते की, आशुरखाना व तकीया मौजे बोरफळ ता. औसा च्या संबंधित सर्वे नं. ७० पैकी जमीन राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ साठी संपादीत झालेली आहे सदर जमीनीचा भुसंपादन मावेजा महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे नावाने पाठविणे बाबत जिल्हा वक्फ अधिकारी लातूर यांनी त्यांचे पत्र क्र. वक्फ/अतियात-६६६-६६६९/२०१७ दि.११/८/२०१७ व पत्र क्र. वक्फ/एसएनटी/८४२ /२०१८ दि.१४/२/२०१८ अन्वये विनंती केली होती परंतु अद्याप पर्यंत वक्फ मंडळास भुसपादन रक्कमेचा धनादेश प्राप्त झालेला नाही.

आशुरखाना व तकीया मौजे बोरफळ ची नोंदशासन राजपत्र दि. १७/४/१९८० पार्ट-अ च्या अनुक्रमांक ६१ वर नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदरील वक्फ संस्थेस सर्वे नं. ७० एकुण क्षेत्र ०२ एकर ०८ गुंठे ईनाम जमीन बहाल असून त्या पेक्षी जमीन राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ साठी संपादीत झालेली आहे. वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ९१ नुसार वक्फ मिळकत शासनाच्या सार्वजनिक उपक्रमासाठी/प्रयोजनासाठी अधीग्रहीत करावयाची असल्यास अधीग्रहण करण्यापुर्वी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची पुर्व परवानगी घेणे अनिवार्य असून भरपाई रक्कम महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे नावाने पाठविणे आवश्यक आहे. सदर रक्कम वक्फ मंडळाचे नावाने पाठविणे बाबत या कार्यालयाने पत्र क्र. मरावमं/एसएनटी-७८/२०१८ दि.१५/२/२०१८ अन्वये सक्षम प्राधिकारी तथा भुसंपादन अधिकारी लातूर यांना पत्र दिले आले असुन पुढील कार्यवाही बाबत निर्णय व आदेशास्तव सादर.

ठराव क्रं. ५६ सदरचा विषयी पुढील बैठकी मध्ये ठेवण्यात यावा.

विषय क्रं. ५७ **सेठ हाजी रहिमतुल्ला सुलेमान दावुनी मॉस्क ट्रस्ट, मुंबईच्या कॅडस्टल सर्व्हे नं. ११८५ (भायखळा डिव्हीजन) च्या विकास कामासाठी व लिज करून देणे बाबत.**

सविनय सादर करण्यांत येते की, प्रादेशीक वक्फ अधिकारी, कोकण विभाग मुंबई यांचे पत्र क्र. २७/२०१८ दि. २४.०४.२०१८ रोजी सेठ हाजी रहिमतुल्ला सुलेमान दावुनी मॉस्क ट्रस्ट, मुंबई हि संस्था वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४३ नुसार क्र. MSBW/MUM/३५१/२०१६ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदर वक्फ संस्थेच्या मिळकत क्र. कॅडस्टल सर्व्हे नं. ११८५ (भायखळा डिव्हीजन), ऑगटन सर्व्हे नं. १/३८७० कलेक्टर ऑफ लेंड रिव्हीन्यु अन्डर रेन्ट रोल नं. ८४२६ व स्ट्रीट नं. ५१ मुंबई-०८ हि मिळकत मध्ये तळ मंजला व दोन मंजला इमारत व त्यामध्ये तळ मंजला मध्ये एक दुकान असुन सदर मिळकत हे १०० वर्षापासून उभी आहे. सदर संस्थेच्या ट्रस्टी यांनी जाहिर नोटीस वृतमान पेपर मध्ये प्रसिध्द करून सदर मिळकतीची विकास कामासाठी एम.एस. युरोलाईन इन्फ्रा प्रोजेक्ट एल.एल.पी यांनी सर्वोच्च बोली रक्कम रू. ८५ लाख दि. २२.०६.२०१६ रोजी व्यवस्थापण समिती यांचे कडे दिलेली आहे. सदर मिळकतीच्या सरकारी मूल्यांकन रक्कम रू. ६२,४५,०००/- अशी आहे. अर्जदार यांनी सदर मिळकतीची भाडे करून कायमस्वरूपी पर्यायी परिसर मिळवून आणि वस्तूस्थितीसंबंधी स्थिती जाणून घेण्यामूळे वक्फ संस्थेला लाभ करण्यासाठी सदर मिळकतीवर विकास कामासाठी व लिज करून देणे बाबत प्रादेशीक वक्फ अधिकारी, कोकण विभाग मुंबई यांनी अहवाल सादर केलेले आहे. प्रकरण पुढील निर्णय व आदेशास्तव सादर.

ठराव क्रं. ५७ **सदरचा विषयी पुढील बैठकी मध्ये ठेवण्यात यावा.**

विषय क्रं. ५८ **महाराष्ट्रीय महामार्ग क्र. २११ चौपदरीकरणासाठी भुसंपादन (मौ. तेरखेडा ते पारगांव) मौ. तेरखेडा येथील गट नं. ४८२, ४८३, ४८४, ४८५, ४८६ व ४८७ मधील संपादीत क्षेत्र व त्यामधील ईतर ताबा धारकांना नाहरकत प्रमाणपत्र देणे व मावेजा वाटप करणे बाबत.**

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे मार्फत राष्ट्रीय राजमार्ग क्र. २११ येडशी (कि.मी.१००.०००) ते औरंगाबाद (कि.मी. २९०.२००) या रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. मौजे तेरखेडा ता. वाशी जि. उस्मानाबाद येथील वक्फ मंडळ अंतर्गत असलेले गट क्र. ४८२, ४८३, ४८४, ४८५, ४८६ व ४८७ चौपदरीकरणात संपादीत होत असलेल्या

जमीनीची ३(A) अधिसुचना दि.२४/०३/२०१३ रोजी स्थानिक वृत्तपत्रातमध्ये प्रसिध्द करण्यांत आले होते. सदरील प्रसिध्दीनंतर जिल्हा वक्फ अधिकारी उस्मानाबाद यांनी सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भुसंपादन मध्यम प्रकल्प क्र. २ उस्मानाबाद यांचेकडे भुसंपादनाची रक्कम अन्य कोणालाही न देता सदरमावेजा हा मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ औरंगाबाद यांचे नावे जमा करण्या बाबत आक्षेप अर्ज दि. २२/४/२०१३, २४/२/२०१४ व २०/३/२०१४ रोजी दिले होते. त्यानंतर सक्षम प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी भुसंपादन कळंब यांनी दि. ९/११/२०१६ रोजी मौजे तेरखेडा ता. वाशी येथील गट क्र. ४८२, ४८३, ४८४, ४८५, ४८६ व ४८७ साठी जमीनीचे रुपये १,३१,१८,१८१/- व सदरील जमीनीवरील बांधकामासाठीचे रुपये २,५७,०२,००२/- चा निवाडा जाहिर केला असे एकुण रुपये ३,८८,२०,१८३/- चा निवाडा घोषीत करण्यांत आला. सदरील निवाडा जाहिर केल्यानंतर जिल्हा वक्फ अधिकारी उस्मानाबाद यांनी दि. २५/१/२०१७ च्या पत्राद्वारे सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भुसंपादन कळंब यांना सदरील जागेवर बांधलेल्या घर मालकां विरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, यांचे न्यायालयात अतिक्रमण हटविण्याची केस क्र. ५४/४४१/२०१२ अन्वये न्यायप्रविष्ट असल्यामुळे संपुर्ण मावेजाची रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्रराज्य वक्फ मंडळ औरंगाबाद यांचेकडे जमा करणे बाबत विनंती केली. मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ औरंगाबादयांनी त्यांचेपत्र दि. १४/२/२०१७ अन्वये परवानगी विना वक्फ मंडळाच्या जागेवर बांधकाम केलेल्या कब्जेदारास वक्फ मंडळाच्या परवानगी शिवाय मावेजा न देण्या बाबत सक्षम प्राधिकारी तथा उप विभागीय भुसंपादन कळंब यांना कळविले.

त्यांनतर सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भुसंपादन कळंब यांनी दि. २४/५/२०१७ रोजी मौजे तेरखेडा ता. वाशी येथील गट क्र. ४८२, ४८३, ४८४, ४८५, ४८६ व ४८७ साठी जमीनीचे रुपये १,४१,२५,११०/- व सदरील जमीनीवरील बांधकामासाठीचे रुपये १,८५,८८,४१६/- चा पुरवणी निवाडा जाहिर केला असे एकुण रुपये ३,२७,१३,५२६/- चा निवाडा घोषीत करण्यांत आला. सदरील पुरवणी निवाडा जाहिर केल्यानंतर जिल्हा वक्फ अधिकारी उस्मानाबाद यांनी दि. १७/६/२०१७ च्या पत्राद्वारे सदरील जागेवर बांधलेल्या घर मालकां विरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, यांचे न्यायालयात अतिक्रमण हटविण्याची केस क्र. ५४/४४१/२०१२ अन्वये न्यायप्रविष्ट असल्यामुळे संपुर्ण मावेजाची रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्रराज्य वक्फ मंडळ औरंगाबाद यांचेकडे जमा करणे बाबत विनंती केली.

त्यानंतर सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भुसंपादन कळंब यांनी दि. २७/६/२०१७ रोजी मौजे तेरखेडा ता. वाशी येथील काही सुटलेल्या बांधकामासाठीचे रुपये ३०,१८,५९२/- चा अतिरिक्त निवाडा जाहिर केला. सक्षम प्राधिकारी तथाउपविभागीय अधिकारी, भुसंपादन कळंब यांनी दि. २८/७/२०१७ व दि.१२/९/२०१७ अन्वये संपादीत क्षेत्रावरील इतर बाबींचा मावेजा निवाडया प्रमाणे भुधारकास वाटप करण्या बाबत नाहरकत प्रमाणपत्र मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ औरंगाबाद यांचेकडे मागीतले.

मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांनी दि. ११/९/२०१७ अन्वये सक्षम प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी भुसंपादन कळंब यांना सदर ईनाम जमीनीवर बसलेले लोक अतिक्रमण धारक असल्याने व त्यांना वक्फ बोर्डाची कसल्याही प्रकारची मान्यता नसल्याने संपादीत जागेचा मोबदल्ला त्यांना देण्यात येऊ नये. असे कळविले.

सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भुसंपादन कळंब यांनी दि. ५/१/२०१७ अन्वये संपादीत जमीनीचा ताबा हस्तांतर करण्या बाबत प्रतिनिधीस प्राधिकृत करण्यांत बाबत कळविले. सक्षम प्राधिकारी तथाउपविभागीय अधिकारी कळंब यांनी दि. २९/११/२०१७ अन्वये जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांना दि. २२/११/२०१७ रोजी जायमोक्यावर भेट दिली असता स्थानिक लोकांचा ताबा आहे. त्यांनी फक्त तदंगभूत वस्तुचे पैसे मिळावे अशी विनंती केली आहे. वक्फ बोर्ड दोन्ही (जमीन व Structure) चे पैसे मागत आहेत. परंतु जागेवर ताबा देण्यास सहमती दर्शवित नाहीत. त्यामुळे मुदतठेव सक्षम प्राधिकारी यांचे नांवे करण्या बाबतच्या धनादेशावर Joint Signatory अभावी बँकेने मुदतठेव करण्या बाबत नकार दिल्याचे व त्या बाबत मार्गदर्शन करण्या बाबत विनंती केली. दि.२२/११/२०१७ रोजी मा. जिल्हाधिकारी उस्मानाबाद व प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण औरंगाबाद यांच्या सोबत तेरखेडा येथे संयुक्त भेटीदरम्यान वक्फ बोर्डाच्या जमीनीवरील घरांचे दुकानांचे ताबा धारकांसोबत जायमोक्यावर चर्चा केली असता लोकांनी २० ते ३० वर्षापासून वास्तव्यास असलेली सदरील घरे तोडल्यानंतर पर्यायी घर / दुकाने उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे सर्व कुटुंब रस्त्यावर येईल त्यामुळे त्यांना बांधकामाचे पैस दिल्याशिवाय ते घरतोडू देणार नाहीत. Physical Possession ला ताबा धारकांचा तिव्र विरोध असुन उपजिवीकेचे तसेच निवा-याचे साधन हिरावणार असल्या कारणाने आंदोलन करुन सरळ आत्मदहन करण्याचा ईशारा प्रत्यक्ष जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांचे देखतच दिला. अशा घडामोडींच्या पार्श्वभूमीवर सक्षम प्राधिकारी तथाउपविभागीय अधिकारी भुंसपादन कळंब यांनी त्यांचे पत्र दि. २९/११/२०१७ नुसार मांडल्याप्रमाणे मुदतठेव करण्या बाबत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग

प्राधिकरणाचा प्रतिसाद मिळत नसल्या बाबतचा अहवाल मा. जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांना सादर केला मुदत ठेवीच्या धोरणा बाबत स्पष्टता नसल्या कारणाने तसेच फक्त मुदतठेव करुन ही वरील परिच्छेतात उल्लेख केल्या प्रमाणे ताबा धारकांचा तिव्र निषेध व आत्मदहना पर्यंत आंदोलन करण्याची तयारी पाहू जाता, मुदतठेव रक्कम २०१६ तसेच मे २०१७ मध्ये सक्षम प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी भुसंपादन कळंब यांचेकडे जमा करुन सुध्दा प्रत्यक्ष जमीनीचा ताबा आज रोजी पर्यंत अप्राप्त आहे ज्या कारणाने मौजे तेरखेडा गावासाठीचा Underpass (VUP) चे बांधकाम तसेच १ कि.मी. लांबी चौपदरीकरणाचे बांधकाम खोळंबलेले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ औरंगाबाद यांनी संबंधित ताबा धारकांना फक्त बांधकाम व जमीनीवरील ईतरबाबींचे (जमीनीचे मुल्यांकन वगळून) मावेजा देण्या बाबत सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भुसंपादन कळंब यांना नाहरकत प्रमाणपत्र देण्याचे करावे जेणेकरुन रखडलेला प्रश्न मार्गी लागेल.

सक्षम प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी भुंसंपादन कळंब यांनी वक्फ मंडळाचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर संबंधित ताबा धारकांना त्वरीत बांधकामाचा मावेजा वाटप करुन जमीनीचा प्रत्यक्ष ताबा भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणांस हस्तांतरीत करावा.

ठराव क्रं. ५८ **सदरचा विषयी पुढील बैठकी मध्ये ठेवण्यात यावा.**

विषय क्रं. ५९ **मौजे सवर ता. बाभुळगांव जि. यवतमाळ येथील वक्फ मिळकत गट क्र. ७२ चे भुसंपादत मावेजा बबत.**

मौजे सावर ता. बाभुळगांव जि. यवतमाळ येथील वक्फ मिळक्त गट क्र. ७२ एकुण क्षेत्र १०.७५ हे.आर जमीन असुन त्या पैकी क्षेत्र ३.६० हे.आर जमीन बाणगांव प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राकरीता संपादीत करण्यासाठी उपकार्यकारी अभियंता मध्यम प्रकल्प विभाग यवतमाळ यांनी पत्र दि. ५/११/२०१५ अन्वये मस्जीद कमेटीला पत्र दिले आहे. सदर जमीन तलावासाठी त्यांच्या ताब्यात देण्याकरीता या कार्यालयाची मंजुरी मिळणेस अर्जदार यांनी विनंती केली आहे. तसेच उपकार्यकारी अभियंता यवतमाळ प्रकल्प बांधकाम विभाग यवतमाळ यांनी त्यांचे पत्र क्र. १८५२/रेखा-३/लखमापुर/भुसं/स.ख/२०१६ दि. २१/४/२०१६ रोजी लखमापुर (संग्राहक) तलावासाठी ईस्लाम मस्जीद सावर च्या मालकीची गट क्र. ७२ पैकी क्षेत्र ३.६० हे. आर शेत जमीन संपादीत करण्यासाठी या कार्यालयाची परवानगी मिळणेस्तव विनंती केली आहे.

ईस्लामी मस्जीद सावर ता. बाभुळगांव जि. यवतमाळ हि संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार क्र. बी-२७ अन्वये नोंदणी झालेली असून महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळा चे अधिकार क्षेत्रा खाली आहे. वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ९१ नुसार वक्फ मिळकत शासनाच्या सार्वजनिक उपक्रमासाठी अधीग्रहीत करावयाची असल्यास अधीग्रहण करण्यापुर्वी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची पुर्व परवानगी घेणे अनिवार्य असून मोबदल्याची रक्कम महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे नावाने पाठविणे बाबतची बाब या कार्यालयाचे पत्र क्र. मरावम/एसएनटी-२९०/१९६०/२०१६ दि. २६/५/२०१६ अन्वये संबंधित विभागाचे निदर्शणास आणुन देण्यात आली होती परंतु काही अज्ञात इसमाने सहाय्यक मुख्य कार्यकारी अधिकारी यांची खोटी स्वाक्षरी करुन खोटे पत्र तयार करुन भुसंपादन रक्कम उचलण्याचा प्रयत्न केला होता त्यावर या कार्यालयाने पत्र क्र. मरावमं/एसएनटी-१/२४७/२०१७ दि. ३/१/२०१७ अन्वये उप कार्यकारी अभियंता यवतमाळ प्रकल्प बांधकाम विभाग यवतमाळ यांना पत्र देऊन खोटे पत्रावरुन कोणास ही रक्कम वाटप करु नये व त्यांच्यावर कार्यवाही करुन भुसंपादन रक्कम सरळ महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे नावाने धनादेश पाठविणे बाबत सुचना दिले आहे परंतु अद्याप भुसंपादन रक्कमेचा धनादेश या कार्यालयास प्राप्त झालेला नाही. प्रकरण पुढील निर्णय व आदेशास्तव सादर.

ठराव क्रं. ५९ **सदरचा विषयी पुढील बैठकी मध्ये ठेवण्यात यावा.**

विषय क्रं. ६० **मस्जीद मौजे सातारा ता. जि. औरंगाबाद येथील इनाम जमीन गट नं. ३०४ क्षेत्र २४ हेक्टर ८० आर पैकी १५२२ चौरस मिटर्स व ५६७८ चौरस मिटर्स चा भुसपादन मावेजा मिळणे बाबत.**

महाराष्ट्र राज्याच्या औरंगाबाद जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ च्या (नवीन राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२) २९०-२०० कि. मि. ३१०-५०० (औरंगाबाद धुळे सेक्शन) पर्यंतच्या प्रस्तावित मार्गासाठी गावाचे नांव क्र. ७ (सातारा) मधील गट क्र. ३०४ क्षेत्र २४ हेक्टर ८० आर, पैकी १५२२ व ५६७८ चौरस मिटर्स जागा दैनिक लोकमत दि. २/१०/२०१६ व दैनिक दिव्य मराठी मधील दि. १४/२/२०१७ मधील अधिसुचने नुसार संपादीत होत आहे. सदर जमीन मस्जीद, सातारा च्या सेवा सशर्थ खिदमत माश जमीन मस्जीदीचे सेवेसाठी बहाल आहे. ज्याची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र दि. १७/५/१९७३ अनुक्रमांक १३८ वर असुन ७/१२ च्या उता-यावर ही हस्तांतरीत न होणारी जमीन अशी नोंद महसूली अभिलेखात आहे. सदर जमीनीत मुतवल्ली इनामदारांनी पदाधिकारी व अधिका-यांशी संगनमत करुन या जमीनीत दि.

१४/७/२०११ रोजी च्या नाहरकत अन्वये परवानगी दिलेली आहे परंतु "मा. महाराष्ट्र वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद यांचे कडील अर्ज क्रमांक ५३/२०१३ मध्ये मा. न्यायालयानी दि. २९/६/२०१३ रोजी प्रकरणांत आहे तशीच परिस्थिती ठेवण्याचे निर्देश दिलेले आहे." प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

तसेच महाराष्ट्र शासानानी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांनी दिलेले सर्व आदेशा संबंधी श्री. के.बी.भोगे (भा.प्र.से) यांची एक सदस्य चौकशी समितीची नियुक्ती केली होती चौकशी अहवालनुसार महाराष्ट्र शासनानी श्री. एन.डी.पठाण, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांनी या बाबतचे सर्व दिलेले आदेश रद्द करण्यांत यावे व या बाबत तातडीने योग्य ती कायदेशिर कार्यवाही करुन सदर जमीन परत ताब्यात घेण्यासाठी यौग्य पावले उचलण्यात यावी असे शासनाचे आदेश आहे. प्रकरणांत पिठासीन अधिकारी तथा जिल्हा न्यायधिश, मा. महाराष्ट्र वक्फ न्यायाधिकरण औरंगाबाद यांनी स्थगीती आदेश दिलेले आहे.

वरील प्रकरणी मस्जीद सातारा ता. जि. औरंगाबाद च्या संबंधित असलेली सेवा सशर्थ खिदमत माश इनाम जमीन गट क्र. ३०४ मधील अधिसुचना नुसार संपादित जमीनीचा मोबदला महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांचे नावाने आजच्या बाजार मुल्यांकन प्रमाणे रक्कम अदा करण्याची विनंती या कार्यालयाचे पत्र क्र. मरावमं/एसएनटी-८०/११४६/२०१७ दि. ११/४/२०१७ व दि. १५/१२/२०१७ अन्वये सक्षम प्राधिकारी (भुसंपादन) तथा उपविभागीय अधिकारी औरंगाबाद यांना करण्यांत आलेली आहे. परंतु अवार्डची प्रत व धनादेश अद्याप या कार्यालयास प्राप्त झालेले नाही. प्रकरण पुढील निर्णय व आदेशास्तव सादर.

ठराव क्रं. ६० **सदरचा विषयी पुढील बैठकी मध्ये ठेवण्यात यावा.**

विषय क्रं. ६१ **चिराग अली कब्रस्तान ट्रस्ट सोलापुर च्या संबंधित सि.स.न. ९९ व ९६९३ मिळकतीचे विकास कामासाठी तत्कालीन मु.का.अ यांनी दिलेले नाहरकत प्रमाणपत्र रद्द करणे बाबत**

१) ॲड. महिबुब बिलाल कोथिंबिरे, सेक्रेटरी चिराग अली कब्रस्तान ट्रस्ट, सोलापुर यांनी दि. २/१२/२०१७ रोजी अर्ज देऊन विनंती केली आहे की, चिराग अली कब्रस्तान ट्रस्ट सोलापुर हे वक्फ मंडळात क्र. MSBW/SLR/५३/२००९ अन्वये नोंदणीकृत असुन सोलापुर येथील टी.पी. १ सि.स.न. ९६९३ व टी.पी. २ सि. स.न. ९९ अशा दोन मिळकतीवर महाराष्ट्र शासन अर्बन डेव्हलपमेंट डिपार्टमेंट तर्फे ५ मार्च २००९ रोजी राजपत्र प्रसिध्द करुन सि.स.न. ९६९३ संदर्भात विकास आराखडा मंजुर करुन सि.स.न.

९६९३ एकुण क्षेत्र १६९६४०.१० चौ.मि. पैकी कब्रस्तान ६७५४४ चौ.मि. टेक्निकल कॉलेज २०२०० चौ.मि., कम्युनिटी हॉल व चॅरिटेबल हॉस्पिटल १०१०० चौ.मि., गर्ल्स स्कूल व हॉस्टेल १०१०० चौ.मि., गार्डन व आपेन स्पेस ११००० चौ.मि., हाऊसींग स्किम २०२०० चौ.मि., बाईज स्कूल, हॉस्टेल व जिमखाना १५४०० चौ.मि. एक्स्ट्रा ओपन स्पेस ५००० चौ.मि. तर सि.सन.९९ एकुण क्षेत्र १३९०० चौ.मि. ही संपुर्ण जागा हाऊसिंग स्किमसाठी आरक्षित केली होती.

महाराष्ट्र शासनाच्या विकास आराखडयास अनुसरुन चिराग अली कब्रस्तान ट्रस्टने वक्फ बोर्डाकडून दि. १८/७/२००९ व दि. १७/१२/२००९ रोजी अर्ज देऊन महाराष्ट्र शासनाच्या मंजुर आराखडयाप्रमाणे नाहरकत प्रमाणपत्र मागीतले होते त्यावर सुनावणी होवून दि. २/१०/२०१० रोजी वक्फ मंडळाने नाहरकत प्रमाणपत्र दिले व त्यानंतर दुरुस्ती नाहरकत प्रमाणपत्र दि. २४/०४/२०१२ रोजी दिले होते त्यानुसार चिराग अली कब्रस्तान ट्रस्टने टी.पी. २ सि.स.न. ९९ वर चिराग रेसीडेन्सी नावाने सदनिका बांधून त्यातील काही फ्लॅट व दुकानाची विक्री केलेली आहे व फ्लॅट अद्याप विक्री झाले नसल्याचे अर्जात नमुद केले आहे.

वरील प्रकरणी शासन निर्णय दि. १३/४/२०१६ प्रमाणे वक्फ मिळकती वरील ट्रस्टींचे नाव कमी करुन त्यावर वक्फ प्रतिबंधीत सत्ता प्रकार अशी नोंद घेण्यासाठी गैरअर्जदारांनी नगर भुमापन अधिकारी सोलापूर यांच्याकडे अर्ज दिला होता आणि वक्फ बोर्डात श्री. शेख खलील शेख हैदर मनाटकर रा. नांदेड यांनी दि. २८/९/२०१७ रोजी दिलेल्या अर्जावर या कार्यालयातर्फे चुकीचे अभिप्राय पाठविण्यात आले असल्याचे अर्जदार यांनी नमुद केले आहे. सदर अभिप्रायामुळे मिळकत विकसीत करण्याचे काम थांबले आहे आणि विनंती केली आहे की, नगर भुमापन अधिकारी सोलापुर यांना पत्र देऊन फक्त कब्रस्तानसाठी आरक्षित असलेल्या ६७५४४ चौ.मि. जागेवर दि. १३/४/२०१६ च्या शासन निर्णया प्रमाणे वक्फ प्रतिबंधित सत्ता प्रकार शेरा मारावा व इतर मिळकती संबंधी टी.पी. २ सि.स.न. ९९ मिळकती वर शासन निर्णयाची अमलबजावणी करण्यांत येऊ नये म्हणुन स्पष्ट अभिप्राय देण्याची विनंती अर्जदार यांनी केली आहे.

२) सदर प्रकरणांत श्री. आय. एस. सय्यद पोलीस निरिक्षक (गुन्हे) सदर बाजार सोलापुर शहर यांचे पत्र क्र. १२७३३/२०१७ दि. २८/११/२०१७ या कार्यालयास दि. १६/१२/२०१७ रोजी प्राप्त झाले आहे. त्यानुसार चिरागअली कब्रस्तान ट्रस्ट ची मालमत्ता विक्री करणे बाबत महाराष्ट्र स्टेट वक्फ बोर्ड यांनी कोणतीही परवानगी दिलेली नाही परंतु वक्फ बोर्डाने दि. २/१/२०१० रोजी दिलेल्या नाहरकत प्रमाणपत्रातील क्र. १४,१५, व १६ मध्ये चिराग अली कब्रस्तान ट्रस्ट चे ट्रस्टींनी बदल करुन दि. २/८१/२०१० रोजीचे वक्फ बोर्डाचे बनावट बोगस

प्रमाणपत्र तयार करुन व त्यावर बनावट सही शिक्का करुन ट्रस्टच्या जागेत बांधकाम करुन फ्लॅट व शॉप विक्री करतांना खरेदी खतांना बनावाट नाहरकत प्रमाणपत्र पुरावा जोडून फसवणुक करुन ट्रस्टचे मालमत्तेचा व पैशाचा अपहार केले बाबतचा अर्ज श्री. कुदुस याकुब कामले यांनी पोलीस निरिक्षक यांच्याकडे दिलेला आहे.

वरील प्रकरणाची चौकशी या कार्यालयाचे अख्त्यारातील सक्षम अधिकारी यांची नियूक्ती करुन रितसर कागदपत्रांची पडताळणी करुन कायदेशिर कार्यवाही करीता अहवाल त्यांचे पोलीस स्टेशनला पाठविण्याची विनंती केली आहे.

३) सोलापुर येथील चिराग अली कब्रस्तान ट्रस्टची वक्फ मिळकतीचे खरेदी विक्री बंद करुन संबंधिता विरुध्द दंडात्मक स्वरुपाचे गुन्हे दाखल करुन सदर वक्फ मिळकतीचा ताबा घेणे तसेच श्री. एन. डी. पठाण यांचे नियमबाहय आदेश विषय क्र. ४ रद्द करणे बाबत श्री. याकुब कांबले रा. सोलापुर यांच्या दि. ०६/०६/२०१७ रोजी च्या अर्जावर मा. श्री. बाबाजानी दुर्राणी साहेब, सदस्य महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, यांनी स्वाक्षरी करुन प्रकरण बोर्डाची मिटींग मध्ये ठेवण्याची तजविज केलेली आहे. वरील प्रकरण निर्णय व आदेशास्तव सादर.

ठराव क्रं. ६१ **सदरचा विषय पुढील बैठकी मध्ये ठेवण्यात यावा.**

विषय क्रं. ६२ **मरकजी सुन्नी जामा मस्जीद मोहल्ला बेलदार जमात, धरणगाव जि. जळगांव च्या संबंधित व्यापारी संकुल मधील एकुण ६६ दुकाने भाडेपट्टयाने देण्यासाठी परवानगी मिळणे बाबत.**

जनाब शेख रियाजोद्दिन शेख लाडजी व जनाब सैफोद्दिन शेख हुस्नोद्दिन अध्यक्ष/सचिव, मरकजी सुन्नी जामा मस्जीद, मोहल्ला बेलदार जमात धरणगांव जि. जळगांव यांनी दि. २२/८/२०१७ रोजी अर्ज देऊन विनंती केली आहे की, सदर वक्फ संस्था वक्फ मंडळात क्र.MSBW/६८/२००८ अन्वये नोंदणीकृत असुन वक्फ मालमत्ता क्र. १४९९ हे गावाचे मध्यवर्ती ठिकाणी असुन त्यावर बेकायदेशिर अतिक्रमण होत असल्याने वक्फ संस्थेच्या उत्पन्नासाठी बेलदार समाजातील गोरगरीबांना पत्र्याचे शेड मध्ये गाळे बांधणेसाठी नाहरकत प्रमाणपत्राची मागणी केल्यावरुन या कार्यालयाने आदेश क्र. मरावमं/एसएनटी-३९२/४१४१/२०१४ दि. १४/७/२०१७ अन्वये परवानगी दिलेली आहे सदरची परवानगी फक्त पत्र्याचे शेड बांधण्या करीता देण्यात आली होती परंतु विश्वस्तांनी दुकानांची बुकींग करुन पक्के आर सी.सी. मध्ये व्यापारी संकुल बांधले आहे व त्यामधील ६६ दुकाने ३० वर्षासाठी भाडेपट्टयाने देण्याची

परवानगी मिळणे व व्यापारी संकुल व समाज हॉल बांधण्याची परवानगी मिळणेस विनंती केली आहे.

प्रादेशिक वक्फ अधिकारी नाशिक यांनी त्यांचे अहवाल पत्र क्र. वक्फ/एसएनटी-१३/२५२/२०१७ दि. २१/९/२०१७ अन्वये सादर केले आहे त्यानुसार मरकजी सुन्ना जामा मस्जीद मोहल्ला बेलदार जमात, धरणगांव जि. जळगांव ही संस्था वक्फ मंडळात नोंदणीकृत असुन वक्फ संस्थेच्या संबंधित मालमत्ता क्र. १४९९ मध्ये एकुण ५३ गाळे (दुकाने) बांधण्यात आले आहे व त्याच प्रमाणे गाळयामागे २२ रुम बांधण्यात येणार आहे. वक्फ संस्थेच्या विश्वस्तांनी संबंधित गाळे धारकाकडून डिपॉझिट रक्कम घेवून पावती दिलेली असुन वक्फ संस्थेच्याउत्पन्न वाढविण्यासाठी व्यापारी संकुल व सामाजिक हॉल बांधने व दुकाने भाडेवर देण्याकरीता विश्वस्तांना परवानगी देणे बाबत विचार करण्याची शिफारश प्रादेशिक वक्फ अधिकारी नाशिक यांनी केली आहे.

वरील प्रकरणांत वक्फ संस्थेचे अध्यक्ष विश्वस्तांनी मुस्लीम समाजाच्या गोरगरीबांना घरे बांधुन देणे बाबत ठराव करुन वक्फ कार्यालयाची पत्र्याचे शेड मध्ये गाळे बांधण्याची परवानगी घेवून आर.सी.सी. चे पक्के बांधकाम करुन बेलदार समाजातील गरीब लोकांचे हित न पाहता सदर ठिकाणी व्यापारी संकुलाचे ५६ गाळे बांधुन इतर समाजातील लोकांना परस्पर १० ते १२ लाख मध्ये एक गाळा देऊन पैशाची उलाढाल करुन बेकायदेशिर कृत्य केले आहे त्यामुळे प्रादेशिक वक्फ अधिकारी नाशिक यांनी दिलेले अहवाल नामंजुर करुन सदर कमेटी बरखास्त करणे बेलदार समाजातील गोर गरीब लोकांना गाळे भाडेवर देणे, आणि वक्फ संस्थेच्या विश्वस्ता अध्यक्ष यांच्या विरुध्द कायदेशिर कार्यवाही करणे बाबत १) श्री. शमशेरखान जान खॉ पठाण रा. जळगांव २) शफकत अली रियासत अली शेख रा. धरणगांव ३) फिरोज नवाब पटेल रा. धरणगाव ४) शेख फरीदोद्दिन शेख रईसोद्दिन व इतर ५) आसिफ खान दलशेर खान व इतर यांनी हरकत दाखल केलेली आहे. तसेच व्यपारी संकुलातील दुकाने हस्तांतर व भाडेपट्टे करु नये म्हणुन शेख फरीदोद्दिन रईसोद्दिन यांनी मा. महाराष्ट्र वक्फ न्यायाधिकरण औरंगाबाद येथे दावा वक्फ सुट क्र. १७३/२०१७ दाखल केलेले आहे जे न्यायप्रविष्ठ आहे. प्रकरण निर्णय व आदेशास्तवसादर.

ठराव क्रं. ६२ **सदरचा विषय पुढील बैठकी मध्ये ठेवण्यात यावा.**

विषय क्रं.६३ **मस्जीद तळेसमन ता. गंगापुर जि. औरंगाबाद ची इनाम जमीन गट क्र. ५६ व ५८ ची मिळकत राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ (५२) प्रस्तावित (औरंगाबाद ते धुळे सेक्शन) साठी संपादीत जमीनीचा मोबदल्ला मिळणे बाबत.**

मस्जीद तळेसमन ता. गंगापुर जि. औरंगाबाद या वक्फ संस्थेच्या संबंधि इनाम जमीन मौजे तळेसमत ता. गंगापुर येथील गट क्र. ५६ क्षेत्र २ हेक्टर ७२ आर व गट क्र. ५८ क्षेत्र ३ हेक्टर ४४ आर जमीन राष्ट्रीय राजमार्ग क्र. २११ चे भाग नवीन राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२ (औरंगाबाद-धुळे सेक्शन) पर्यंत भुखंडाचा वळण रस्ता रुंदीकरणसाठी संपादीत होत असल्याची अधिसुचना दैनिक लोकमत मध्ये दि. ३/११/२०१४ (अधिसुचना दि. १७/९/२०१४) प्रसिध्द झाली होती. सदरील इनाम जमीनीची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र दि. १/११/१९७३ च्या अनुक्रमांक ६५ वर असुन महसुली अभिलेख ७/१२ मध्ये आहे. सदरील जमीन राष्ट्रीय महामार्गसाठी संपादीत करु नये म्हणुन मा. उपविभागीय अधिकारी तथा समक्ष प्राधिकारी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग क्र. २११ औरंगाबाद यांच्याकडे या कार्यालयाचे पत्र क्र. मरावमं/एसएनटी-३५१/२६१२/२०१७ दि. २७/१०/२०१७ अन्वये अक्षेप/हकरत दाखल करण्यांत आले व इनाम जमीन गट क्र. ५६ व ५८ पैक्की संपादीत क्षेत्राची भरपाई रक्कम महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे नाहरकत प्रमाणपत्रा शिवाय इतर कोणालाही वाटप करु नये भुसंपादनाचा मोबदल्ला रक्कमेचा धनादेश महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या नावाने पाठविणे बाबत कळविण्यांत आले आहे. परंतु अद्याप भुसंपादन रक्कम वक्फ मंडळास प्राप्त झालेली नाही.

प्रकरणांत जिल्हा वक्फ अधिकारी औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्र. ३६४/२०१७ दि. १८/११/२०१७ अन्वये अहवाल सादर करुन इनाम जमीनीचे भुसंपादन मोबदल्ल्याची रक्कम मिळविण्यासाठी वक्फ मंडळाचे पॅनल वरील ॲडवहोकेटची नियुक्ती करण्याची विनंती केली आहे. प्रकरण निर्णय व आदेशास्तव सादर.

ठराव क्रं. ६३ **सदरचा विषय पुढील बैठकी मध्ये ठेवण्यात यावा.**

विषय क्रं.६४ **महाराष्ट्र राज्याच्या औरंगाबाद जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ च्या (नवीन राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२) २९०-२०० कि. मि. ३१०-५०० (औरंगाबाद धुळे सेक्शन) पर्यंतच्या प्रस्तावित मार्गासाठी संपादित (गंधेली) मधील गट क्र. ३०२ एकुण क्षेत्र पैकी ११७०० चौरस मिटर्स जागेचा मोबदला रक्कमे बाबत.**

मौजे गंधेरी ता. जि. औरंगाबाद येथील वक्फ मिळकत सर्वे नं. ३०२ मधील एकुण क्षेत्रा पैकी ११७०० चौ. मिटर्स जागा राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ साठी संपादित झालेली असुन त्याचा निवाडा रक्कम २,८६,२८,९८३/- मंजुर झालेली आहे या बाबत मस्जीद कमीटीला दि. १६/१/२०१८ रोजी नोटीस मिळालेली आहे.

सर्वे नं. ३०२ इनाम जमीन असुन मस्जीद, गंधेली ता. जि. औरंगाबाद च्या संबंधित आहे व त्याची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र दि. १७/५/१९७३ पार्ट-सी अनुक्रमांक १०६ वर असुन वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३६ नुसार क्र. MSBW/ABD/८५४/२०१६ दि. १७/१२/२०१६ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदरील वक्फ संस्थेस सर्वे नं. १३९ (गट क्र. ३०२) एकुण क्षेत्र १३ एकर सेवा इनाम जमीन आहे.

सदरची वक्फ मालमत्ता वक्फ संस्थेच्या सेवेसाठी बहाल आहे त्याचे संपादनाचा मोबदला वक्फ मंडळाकडे जमा होणे आवश्यक असल्याने मोबदल्याची एकुण रक्कम २,८६,२८,९८३/- चा धनादेश महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद या नावाने देणे तसेच सदर मोबदल्ला रक्कम महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे नारहकत प्रमाणपत्रा शिवय इतर कोणत्याही व्यक्तीस किंवा संस्थेस मोबदल्ला रक्कम देण्यात येऊ नये म्हणुन सक्षम प्राधिकारी (भुसंपादन) तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना पत्र क्र. मरावमं/एसएनटी-२४/३१५/२०१८ दि. २२/१/२०१८ अन्वये कळविण्यांत आले. सदर भुसंपादन रक्कम वक्फ मंडळा अद्याप प्राप्त झालेली नाही. प्रकरण निर्णय व आदेशास्तव सादर.

ठराव क्रं. ६४ **सदरचा विषय पुढील बैठकी मध्ये ठेवण्यात यावा.**

विषय क्रं. ६५ **दर्गाह हजरत पीर सय्यद बद्रोद्दिन साहेब, कवठेमहाकाळ जि. सांगली च्या संबंधित मिळकतीचे बेकायदेशिर भुसंपादन थांबविणे बाबत**

वक्फ संस्था दर्गाह हजरत पीर सय्यद बद्रोद्दिन साहेब, कवठेमहाकाळ जि. सांगली च्या संबंधित मिळकत मुख्याधिकारी नगरपंचायत गवठेमहाकाळ जि. सांगली हे वक्फ मंडळाची व वक्फ संस्थेची कोणतीही परवानगी न घेता संपादीत करुन जमीन ताब्यात घेण्याची कार्यवाही करीत असल्याची तक्रार जनाब रफिक महेबुब शिरोळकर (ईनामदार) व इतर रा. कवठेमहाकाळ जि. सांगली यांनी दि. २३/१/२०१८ रोजी केली होती.

दर्गाह हजरत पीर सय्यद बद्रोद्दिन साहेब मौजे कवठेमहाकाळ ता. कवठेमहाकाळ जि. सांगली ही संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार बी-१४० अन्वये नोंदणीकृत असुन वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४३ नुसार क्र. MSBW/SGL/२१०/२०१६ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदरील वक्फ संस्थेस अनुसुचि-१ नुसार

मौजे कवठेमहाकाळ येथे गट क्र. ५३२, ५३३, ५३४, ५३५, ५३६, ५४५, ५४६, ५४७, ५४८, ५४९, ५५०, ५५१ हे वक्फ मिळकती असुन सर्वे नंबरचे वाडी विभाजनानंतर गट पडलेले आहे व सध्याचे गट नंबर १४४७ व इतर चा दाखला गांव कामगार तलाठी यांनी दिलेला आहे. तसेच वक्फ मालमत्ता सार्वजनिक उपक्रमासाठी संपादित करण्यासाठी वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ९१ नुसार कोणतीही सुचना वक्फ मंडळास देण्यात आलेली नाही. अर्जदार यांच्या विनंतीवरुन वक्फ मिळकतीचे संरक्षणासाठी सदर जमीन शासनाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी संपादीत करु नये अथवा जबरदस्तीने जमीन मोजणी व ताबा घेण्याची तसेच भुसंपादन मोबदल्ला वाटप करण्याची कार्यवाही करु नये म्हणुन मुख्याधिकारी नगरपंचायत, कवठेमहाकाळ तसेच उप अधिक्षक भुमी अभिलेख, कवठेमहाकाळ व इतर यांना या कार्यालयाचे पत्र क्र. मरावमं/एसएनटी-३८/४३१/२०१८ दि. २५/१/२०१८ अन्व्ये सुचना देण्यात आली होती त्यानुषंगाने मुख्याधिकारी नगरपंचायत कवठेमहाकाळ यांनी मोजणीच्या कार्यवाही स्थगीत केले आहे. प्रकरण पुढील आदेशास्तव सादर.

ठराव क्रं. ६५ सदरचा विषय पुढील बैठकी मध्ये ठेवण्यात यावा.

विषय क्रं. ६६ जामा मस्जीद वक्फ जमातूल मुस्लेमीन म्हसाळा जि. रायगड च्या संबंधित असलेल्या वक्फ मिळकतीत शाळा बांधकामासाठी बिनशेती करुन घेण्यास मान्यता मिळणे बाबत.

जामा मस्जीद वक्फ जमातुल मुस्लेमीन म्हसाळा जि. रायगड ही संस्था महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार बी-२४ अन्वये नोंदणीकृत संस्था आहे.

दि. १/१/१९९६ पासुन वक्फ अधिनियम १९९५ संपुर्ण महाराष्ट्रात लागु करण्यात आलेला असुन कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असुन MSBW/RGD/१५०/२००९ अन्वये रितसर नोंदणी करण्यांत आलेली आहे. सदर संस्थेची मा. उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन जि. रायगड यांच्याकडे संस्थेच्या संबंधित असलेली वक्फ मिळकत सर्वे नं. ६७/१२ क्षेत्र १-५४-०

आकार ०-४७ या जमीनीत मुलीची शाळेचे बांधकाम करण्यांसाठी बिन शेती परवानगी देण्याची विनंती केली आहे. मा. सदस्य यांनी सदर संस्थेचे वरील प्रस्तावास मान्यता बाबत विनंती केली आहे मान्यतेस्तव सादर.

ठराव क्रं. ६६ **सदरचा विषय पुढील बैठकी मध्ये ठेवण्यात यावा.**

स्टोअर विभाग

विषय क्रं. ६७ विवाह फॉर्म (सियाजात) व फाईल कवर छपाई खर्चास मान्येता मिळणे व सियाजात ची किंमत ठरविणे बाबत बाबत.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळा, औरंगाबाद यांच्या कडील सियाजात फॉर्म व फाईल कव्हर संपल्यामुळे तातडीने छपाई करुन घेणे आवश्यक होते त्यासाठी विवाह फॉर्म छपाई करिता ई टेंडरींग द्वारे निविदा मागवुन पाच हजार सेट तयार करुन घेण्यात आलेले आहे त्या साठी जि.एस.टी. सह रक्कम रुपय ७,६३,५००/- खर्च झालेला आहे. तसेच फाईल कव्हर १०,०००/- कोटेशन मागवुन छापाई करुन घेणय्ात आलेले आहे त्यासाठी रक्कम रुपये ४०,७१०/- खर्च झालेला आहे त्यास मान्यता मिळावी.

मराठवाडा वक्फ मंडळाच्या कार्यकाळापासून अधिकृत नियुक्त काजी व नायब काजी यांना प्रति सेट खालील दरा प्रमाणे देण्यात येत आहे.

अ. क्रं.	काजी /नायब काजी	रुपये
१	वंशपरंपरागत नियुक्त कार्जीना द्यावयाचे दर	रुपये ८००/-
२	नियुक्त नायबकार्जी व कारीउन-निकाह यांना द्यावयाचे दर	रुपये १०००/-

छपाईच्या खर्चात जिएसटी मुळे वाढ झाल्याने सद्या जुन्या दराने सियाजात विक्री करण्यात येत आहे. त्यात सियाजात च्या किंमती मध्ये खालील प्रमाणे वाढ करणे आवश्यक आहे. मान्यतेस्तव सादर

अ. क्रं.	काजी /नायब काजी	रुपये
१	वंशपरंपरागत नियुक्त कार्जीना द्यावयाचे दर	रुपये १२००/-
२	नियुक्त नायबकार्जी व कारीउन-निकाह यांना द्यावयाचे दर	रुपये १५००/-

ठराव क्रं. ६७ **यावर सविस्तर चर्चा होऊन चर्चे अंती सियाजात (विवाह फॉर्म) प्रस्तावित दरा प्रमाणे विक्री करण्यास मान्यता देण्यात येत आहे तसेच विवाह लावणा-या काजी नायब काजी व कारी उन निकाह यांनी नव-या च्या बाजू कडुन रुपये ७००/- व नवरीच्या बाजु कडुन ३००/- फी घ्यावी या पेक्षा जास्त घेता कामा नये असे सर्वानुमते ठरले.**

विषय क्रं. ६८ **कार्यालयीन स्टेशनरी खरीदी करण्यात मान्यता मिळणे बाबत.**

सविनय सादर करण्यात येत आहे की, कार्यालयाच्या दैनंदिन कामासाठी कागद व ईतर साहित्य खरेदी करावे लागत आहे. सद्या स्टेशनरी संपलेली असून खरेदी करणे आवश्यक आहे.

कार्यालयीन स्टेशनरी व साहित्य इत्यदी वेळोवेळी आवश्यक्तेनुसार खरेदी करण्यास मान्यता मिळावी.

ठराव क्रं. ६८ **यावर सविस्तर चर्चा होऊन चर्चे अंती कार्यालयीन कामासाठी वेळोवेळी स्टेशनरी व साहीत्य खरेदी करण्यास मु.का.अ. यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहे. असे सर्वानुमते ठरले.**

मा. सर्व सदस्यांनी खालील प्रमाणे सुचनेनुसार संबंधीतांनी अंमलवजावणी करावी.

मा. हुसैन दलवाई साहेब

१. दिलीप चित्तलांगे यांच्या कडील वक्फ मिळकत तात्डीने परत घेण्यासाठी जिव्हा वक्फ अधिकारी औरंगाबाद यांनी सर्व तो परी पुर्तता करुन तीन आठवड्याचे आत कार्यवाही करावी
२. श्री. बाफना कैलाश मोटर्स, औरंगाबाद
३. गांधी ट्रॅक्टर औरंगाबाद
४. नाथ पेपर मिल
५. मौलाना आझाद कॉलेज औरंगाबाद
६. व्हिडिओकॉन कंपनी औरंगाबाद तसेच महाराष्ट्रातील वक्फ संस्थांच्या ईत मौल्यवान वक्फ मिळकती बाबत खालल प्रमाणे तपशील वक्फ मंडळाच्या सदस्यांना देण्यात यावी.
    a) नुझुल भाडे पटट्याचे आदेश व आदेशां संबंधी घेतलेले ठरावाची प्रत करार नाम्याची प्रत सद्यस्थिती एका माहिन्याच्या आंत देण्यात यावी.

मा. आसिफ शौकत कुरेशी साहेब

१. २६/०१/२००८ ते दि. ०८ मे २०१८ पर्यंत झालेल्या सर्व ठरावाची प्रति व त्यावर झालेल्या अंमलबाजवणी त्याचा सविस्तर अहवाल सादर करावे.
२. सिल मध्ये असलेले मिटींग व ईतर सर्व विभागाचे सर्व कागद पत्र संचिका काढून सर्वाना नोंदणी करुन ज्या त्या विभागाला देण्यात यावे.
३. शेख जफर शेख ईब्राहीम निवृत्त कर्मचारी यांचे दि. ०८/०४/२०१८ रोजी अर्जानुसार त्यांना देय असलेली रक्कम ग्रॅज्युटी, रजा रोखीकरणाची रक्कम, ५ व ६ वेतनाची रक्कम ईत्यादी अदा करण्यात यावी.
४. वक्फ मंडळा वरील पॅनल वरील ॲडव्होकेट यांच्या कडुन सर्व संचिका परत मागविण्यात यावी व त्यांना ॲडव्होकेट पॅनल नविन तयार करत असल्याची सुचना देण्यात यावी. संबंधीता कडुन संचिका परत येत नसतील तर त्यांच्या विरुध्द बार कॉउन्सील महाराष्ट्र व गोवा यांच्या कडे तक्रार दाखल करावी.
५. महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण तसेच मा. उच्च न्यायालय मुंबई सह खंडपीठ औरंगाबाद नागपूर येथील सरकारी वकीलांा वक्फ मंडळाच प्रकरणे देण्यात यावे त्यासाठी प्रयत्न करावे. वार्षिक पाच लाखाच्या उतपन्ना वरील वक्प संस्थांचे यादी सर्व सदस्यांना देण्यात यावी. वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३८ नुसार त्यावर कार्यकारी अधिकारीची नियुक्ती करणे बाबत विचार करण्यात येईल.
६. धर्मदाय आयुक्ताकडे वक्फ मंडळाची देय असलेली पाच कोटीच्या वरील रक्कम थकीत असून वक्फांच्या बी संवर्गातील सर्व संचिका तसेच मुस्लीम समुदायाच्या धार्मिक स्थळांच्या ई व एफ मधील बहुतांश संचिका व अनुसुची १, २, ३, व १०, अद्याप पर्यंत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळा कडे त्यांच्या कडुन देण्यात आलेले नाही या बाबत गांभीरयाने विचार करणे आवश्यक आहे म्हणून सचिव अल्पसंख्यांक विकास विभाग,मंत्रालय, मुंबई सचिव कायद व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई तसेच धर्मदाय आयुक्त मुंबई तसेच मु.का.अ. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद व सन्माननीय सदस्यांची बैठक मंत्रालयात आयोजित करण्यात यावी.

मा. खालीद बाबू कुरेशी साहेब,

१. मिटींग चा अजेंडा ८ दिवस पुर्वी देण्यात यावा.
२. ए.टी.ए के शेख यांचे रिपोर्ट वर कार्यवाहीचा तपशील देणयात यावे.
३. दुसरे सर्वेक्षाचा सद्यचे स्थितीचा अहवाल देण्यात यावे.
४. वेबसाईट अद्यावत करण्यात यावी.

ऐनवेळेचे विषय मा. अध्यक्ष साहेबांचे परवानगीने

विषय क्रं. ६९
ठराव क्रं. ६९

स्विपर यांच्या पगारात वाढ करणे बाबत.

सभे समोर श्रीमती अंजूम बानो हे हजर होऊन त्यांनी अशी विनंती केली की, त्यांची आई मृत्यु पर्यंत वक्फ मंडळात स्विपर म्हणून काम करत होत्या त्यांच्या निधना नंतर मी दरमाह रुपये ५०००/- रुपये मानधना वर काम करित आहे तरी माझ्या मानधना मध्ये वाढ करण्यात यावी अशी विनंती केली.

यावर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती महागाई लक्षात घेता संबंधीताच्या पगारात वाढ करणे आवश्यक असुन त्यांना दरमाह रुपये ५०००/- वाढ करण्यात येऊन असे एकुण रुपये १०,०००/- दरमाह ईस्टेट पंचक्की च्या खात्यातून अदा करण्यास सर्वानुमते मान्यता देणयात येत आहे.

या बैठकीत सभेचे अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांनी अशी सुचना केली की वरील सर्व ठराव मंजूर करण्यात आले असून ते कायमही करण्यात येत आहे. पुढील बैठकीची वाट न पाहता अमलबजावणी ची कार्यवाही करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

(मा. खा. जनाब हुसैन दलवाई साहेब)
सभेचे अध्यक्ष,

29/5/18

(मा. जनाब एस.सी.तडवी साहेब)
सदस्य सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,